दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक ३२१ । शुक्रवार ४ सप्टेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## पुण्याहून अपहरण...
### समृद्धी महामार्गावर तरुणाची सुटका; सहा जणांना अटक

**कोपरगाव :** पुण्याहून तरुणाचे अपहरण करून उत्तर प्रदेशात पळवून नेण्याचा धक्कादायक प्रकार समृद्धी महामार्गावर उधळण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवडच्या चिखली परिसरातून अरशद शकील अहमद सिद्दीकी (वय २४) या तरुणाचे अपहरण झाल्याची माहिती समृद्धी कंट्रोल रूमला मिळाली होती. आरोपी अर्टिगा कारमधून सिन्नरमार्गे नागपूरच्या दिशेने पळत असल्याचे समजताच बाभळेश्वर महामार्ग पोलिसांनी जाळे टाकले.चॅनल क्र. ५२३ जवळ संशयित कार दिसताच पोलिसांनी पाठलाग सुरू केला. तब्बल ३ किलोमीटरच्या थरारक पाठलागानंतर चॅनल क्र. ५२० जवळ पोलिसांनी कारला घेरून थांबवले.कारमधून महमद अन्वर सिद्दीकी (३९), निजामुद्दीन सिद्दीकी (४१), फाजील हुसेन सिद्दीकी (२३), महंमद साहील सिद्दीकी (२१), महंमद इमामुद्दीन सिद्दीकी आणि सायमा खातून सिद्दीकी (२६) (सर्व रा. उत्तर प्रदेश) या ६ आरोपींना ताब्यात घेऊन पीडित तरुणाची सुखरूप सुटका करण्यात आली. कार कोपरगाव शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

## महत्वाचे..

### एनसीएमसी कार्डशिवाय एसटीतील ५० टक्के सवलत कायम

**मुंबई :** राज्यातील महिला आणि ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी महामंडळाच्या बस प्रवासात मिळणाऱ्या ५० टक्के भाडे सवलतीसाठी एनसीएमसी कार्डची करण्यात आलेली सक्ती तात्पुरती शिथिल करण्यात आली आहे. ऐन गौरी-गणपती उत्सवाच्या काळात महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार महिला आणि ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना ही सवलत लागू आहे. मात्र, अलीकडेच सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. कार्ड नसल्यास प्रवाशांकडून पूर्ण तिकीट आकारले जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

याबाबत माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून एनसीएमसी कार्डची सक्ती तात्पुरती करू नये, असे निर्देश दिले आहेत.

# बैठका नकोत...
# १० तारखेपर्यंत थेट जीआर काढा!
## उपोषणस्थळी सरकारच्या शिष्टमंडळासमोर मनोज जरांगे पाटील आक्रमक; ओबीसी प्रमाणपत्रातील अडचणींचा पाढा वाचला
### मंत्रालयात स्वतंत्र मराठा-कुणबी कक्षाची मागणी; प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी नेमण्याचे शासनाचे आश्वासन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला कुणबी व ओबीसी प्रमाणपत्र मिळावे, या मागणीसाठी उपोषणावर असलेल्या मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी गुरुवारी राज्य सरकारचे शिष्टमंडळ उपोषणस्थळी पोहोचले. या भेटीत मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी प्रमाणपत्र मिळविताना मराठा समाजाला येणाऱ्या अडचणींचा थेट पाढाच सरकारच्या प्रतिनिधींसमोर वाचून दाखवला.

उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री मकरंद पाटील आणि भाजपचे आमदार प्रसाद लाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता. व्यासपीठावर झालेल्या चर्चेदरम्यान जरांगे पाटील यांनी प्रमाणपत्र वितरणाच्या प्रक्रियेतील त्रुटी, वंशावळीच्या नोंदींची अडचण आणि प्रशासनाकडून होणारा विलंब यावर सरकारला जाब विचारला.

सरकारच्या विद्यमान नियमांनुसार अनेक प्रकरणांमध्ये वंशावळ ग्राह्य धरली जात नाही. तसेच नातेसंबंध, रक्ताचे नाते आणि कुळाची



माहिती उपलब्ध असूनही कुणबी किंवा ओबीसी प्रमाणपत्र मिळण्यात अडथळे येत असल्याचा मुद्दा जरांगे पाटील यांनी उपस्थित केला. यावर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रमाणपत्रासंदर्भातील प्रश्नांवर येत्या १० तारखेला निर्णयासाठी बैठक घेण्यात येईल, असे सांगितले. मात्र, त्यावर जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत, १० तारखेला बैठक नको, तर थेट शासन निर्णय काढा, अशी स्पष्ट मागणी केली.

जरांगे पाटील यांनी मंत्रालयात स्वतंत्र मराठा-कुणबी कक्ष स्थापन (पान ४ वर)

**मनोज जरांगे पाटील ठाम :**
**'आश्वासनांवर नाही, जीआरवर विश्वास!'**

- १० तारखेला बैठक नको; थेट शासन निर्णय काढावा.
- हैदराबाद गॅझेटनुसार पात्र मराठा बांधवांना कुणबी व ओबीसी प्रमाणपत्र मिळण्यात अडथळे येऊ नयेत.
- वंशावळ, रक्ताचे नाते आणि कुळाच्या नोंदींना प्रमाणपत्रासाठी स्पष्ट मान्यता मिळावी.
- मंत्रालयात तातडीने स्वतंत्र मराठा-कुणबी कक्ष स्थापन करावा.
- ५८ लाख नोंदींतील पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र व व्हॅलिडिटीची प्रक्रिया सुलभ करावी.
- अर्जदारांना कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी जिल्हास्तरावर प्रभावी यंत्रणा उभारावी.

**शासनाचे आश्वासन :**
**'प्रमाणपत्रासाठी जिल्हानिहाय नोडल अधिकारी'**

- कुणबी प्रमाणपत्र प्रक्रियेसाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी नेमण्यात येणार.
- प्रमाणपत्रांबाबत निर्माण होणाऱ्या अडचणींचे जिल्हास्तरावर निराकरण करण्याचा प्रयत्न.
- नोंदींच्या याद्या ५ सप्टेंबरपर्यंत ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार.
- नातेसंबंध, रक्ताचे नाते आणि कुळाच्या आधारे उपलब्ध नोंदींचा लाभ पात्र अर्जदारांना मिळवून देण्याचा प्रयत्न.
- प्रशासनाकडून येणाऱ्या अडचणींसाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन.
- प्रमाणपत्रासंदर्भातील निर्णय प्रक्रियेसाठी सरकारकडून पुढील पावले उचलण्याचे आश्वासन.

## पंगतीसाठी सात दिवस आधी परवानगी
### एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांचा आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** सार्वजनिक ठिकाणी जेवणाची पंगत आयोजित करायची असेल तर आता सात दिवस आधी परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

राज्यात सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे यासाठी एफडीए ने विशेष ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. हा प्लॅन ३ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. यापुढे सार्वजनिक ठिकाणी सामूहिक भोजन, महाप्रसाद, भंडारा, लंगर यासारखा कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी सात दिवस आधी प्रशासनाला माहिती द्यावी लागणार आहे.

केवळ परवानगीच नव्हे, तर केटररने स्वयंपाकासाठी लागणारा माल कुठून खरेदी केला, याचीही माहिती द्यावी लागणार आहे.

याबाबत आयुक्त तुकाराम मुंढे म्हणाले, ईद असो किंवा दिवाळी, सणांच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि निरोगी अन्न मिळाले पाहिजे. महाराष्ट्रात 'सेफ फूड अँड सेफ ड्रग' ही संकल्पना राबवली जात आहे. सणांच्या काळात अन्नाची मागणी वाढते, त्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असते.

या विशेष मोहिमेअंतर्गत जानेवारी ते डिसेंबर या संपूर्ण वर्षभरातील सण लक्षात घेऊन तपासणी होणार आहे. ईद, होळी, बकरी ईदपासून गणेशोत्सव, नवरात्री आणि दिवाळीपर्यंत सर्वच सणांमध्ये एकच कायदा लागू राहणार असून कोणत्याही एका धर्मासाठी वेगळे नियम असणार नाहीत.

विशेषतः उपवासाचे पदार्थ, खाद्यतेल, सुकामेवा, बेकरी उत्पादने आणि ऑनलाईन विकले जाणारे अन्नपदार्थ यावर एफडीए चे विशेष लक्ष असणार आहे. तसेच भंडारा आणि महाप्रसाद तयार करणाऱ्या आचाऱ्यांना फूड सेफ्टीचे नियमित प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

## जिममधील तरुणांना नशा विकणारे तिघे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील गांधी मैदान परिसरात जिममध्ये जाणाऱ्या तरुणांना नशा आणि ताकद वाढवण्यासाठी बेकायदेशीर औषधे विकणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यांच्याकडून ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकाराने शहरातील तरुण वर्गामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख व पथक शहरात गस्त घालत होते. त्यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मार्कंडेय शाळेसमोर काही तरुण डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय नशेची औषधे विकण्यासाठी थांबले आहेत. पोलिसांनी तातडीने दोन पंचांना सोबत घेऊन औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांच्या उपस्थितीत दुपारी छापा टाकला.

या कारवाईत प्रताप अशोक अकोलकर (वय २१, रा. करंजी, ता. पाथर्डी), तेजस गंगाधर वारुळे (वय २१, रा. तपोवन रस्ता, अहिल्यानगर) आणि तेजस अमित उळागड्डे (वय २२, रा. गजानन कॉलनी, अहिल्यानगर) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत त्यांच्या काळ्या पिशवीत कमी रक्तदाबावर वापरल्या जाणाऱ्या मेफेंटरमाइन सल्फेटच्या ४० बाटल्या आणि एक मोटारसायकल असा एकूण ३५ हजार रुपयांचा माल सापडला.चौकशी दरम्यान आरोपींनी कोणतीही परवानगी नसताना ही औषधे समाजमाध्यमावरून ऑनलाईन मागवून नशा करण्यासाठी विक्री करत असल्याची कबुली दिली. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय हे औषध घेतल्यास भ्रम होणे, चक्कर येणे आणि जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अन्न व औषध प्रशासनाने यातील नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. याबाबत महिला पोलीस हवालदार रोहिणी अशोक दरंदले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोर्ट सुरू असतानाच न्यायाधीशांना सक्तीची सेवानिवृत्ती



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** एकीकडे बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटना थांबता थांबत नाहीत, तर दुसरीकडे न्याय देणाऱ्या न्यायालयातच एका धक्कादायक घटनेने सर्वांना हादरवून सोडले आहे. अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयात कामकाज सुरू असतानाच अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांना भर कोर्टात सक्तीच्या सेवानिवृत्तीचा आदेश बजावण्यात आला.

सकाळची वेळ. न्या. डॉ. तेहरा यांनी नेहमीप्रमाणे कामकाजाला सुरुवात केली होती. त्याआधीच त्यांनी आगामी लोकअदालतीच्या पार्श्वभूमीवर सर्व न्यायाधीश, भूसंपादन अधिकारी आणि संबंधित विभागांची बैठक घेतली होती. सर्वकाही सुरळीत सुरू होते. वादी-प्रतिवादी, वकील आपापल्या खटल्याच्या प्रतीक्षेत होते. आणि तेवढ्यात बीडच्या प्रमुख जिल्हा न्यायाधीशांच्या पथकाने न्यायालयात प्रवेश केला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हे पथक थेट न्या. तेहरा यांच्या दालनात पोहोचले आणि त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. क्षणात संपूर्ण न्यायालय परिसरात कुजबुज सुरू झाली. न्यायदानाचे काम सुरू असताना न्यायाधीशालाच अशा प्रकारे सेवानिवृत्ती दिली जाणे, ही न्यायालयीन वर्तुळात अत्यंत अपवादात्मक आणि शुचितेच्या दृष्टीने केली जाणारी कारवाई मानली जाते.

कोर्टाच्या आवारात वकिलांचे घोळके जमले, कर्मचारी अवाक झाले. काय घडले, हे कोणालाच कळेना. पण आदेश उच्च न्यायालयाचाच असल्याने सर्वांनी तो गंभीरपणे घेतला.

न्यायाधीशाला सक्तीची सेवानिवृत्ती का देण्यात आली, याचे कारण अद्याप अधिकृतपणे समोर आलेले नाही. मात्र, भर कोर्टात झालेल्या या कारवाईने बीडच्या न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**अंबाजोगाई न्यायालयात खळबळ**

**इतिहासाची पुनरावृत्ती**

**अंबाजोगाईच्या याच जिल्हा न्यायालयात तब्बल १५ वर्षांपूर्वी अशीच एक घटना घडली होती. तेव्हाही एका न्यायाधीशाला अशाच प्रकारे सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात आली होती. इतिहासाची पुनरावृत्ती झाल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.**

## 'डीजे'ला विरोध : विद्यानंद बापट यांना मारहाण
### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशाने पोलिस संरक्षण जाहीर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** गणेशोत्सवात लाऊडस्पीकर आणि डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला विरोध करणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना आज पुण्यात मारहाण झाल्याच्या घटनेची गृह मंत्रालयाने गंभीर दखल घेतली आहे.

टिळक रस्त्यावरील कशाळे चौकात एका वृत्तवाहिनीशी बोलत असताना विद्यानंद बापट यांच्यावर संतोष चव्हाण नावाच्या तरुणाने अचानक हल्ला करून मारहाण केली. ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. हल्ल्यानंतर पोलिसांनी हल्लेखोर संतोष चव्हाण याला ताब्यात घेतले आहे.

या घटनेनंतर पुण्यात तीव्र संताप व्यक्त होत असून या हल्ल्याचा सर्व स्तरातून निषेध होत आहे. विद्यानंद बापट हे गणेशोत्सवातील ध्वनी प्रदूषणाबाबत पत्रकारांशी बोलत आपली भूमिका मांडत होते. यावेळी जन जागृती प्रतिष्ठान मंडळाचा संस्थापक संतोष चव्हाण तिथे आला आणि 'तो चुकीचा बोलतो' म्हणत त्याने बापट यांच्या कानशिलात लगावली. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी हल्लेखोराला रोखले.

विद्यानंद बापट हे नारायण पेठेतील रहिवासी असून त्यांनी पुणे महापालिकेच्या बैठकीत गणेशोत्सवात डीजे आणि मोठ्या आवाजातील लाऊडस्पीकरवर पूर्णपणे बंदी घालावी अशी मागणी केली होती.

**एक वेडा अचानक आला आणि त्याने माझ्यावर हल्ला केला. तुम्ही पाहात होतात. मी सशस्त्र नव्हतो हे पाहून त्यांनी हल्ला केला. किंवा आजूबाजूला पोलीस नव्हते हे पाहून त्याने हल्ला केला. जर पोलीस असते तर ते सशस्त्र. टेकनिकली पोलीस इथे आहेत पण त्यांच्याकडे रिव्हॉल्व्हरच नाहीये. हे बघून ते करतायेत. घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात... त्याला फक्त चीप पब्लिसिटी पाहिजे होती. सवंग प्रसिद्धीसाठी.**

**- विद्यानंद बापट**

# दुष्काळावर मात करण्यासाठी महाराष्ट्र-ऑस्ट्रेलिया हातमिळवणी
## न्यू साउथ वेल्स राज्याशी ऐतिहासिक सामंजस्य करार : ९० दिवसांत कृती आराखडा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मराठवाडा आणि विदर्भाच्या कायमच्या दुष्काळी डागावर आता ऑस्ट्रेलियाच्या अनुभवातून उत्तर शोधले जाणार आहे. महाराष्ट्र सरकारने थेट ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स राज्याशी ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी न्यू साउथ वेल्सचे प्रमुख क्रिस मिन्स यांच्या उपस्थितीत हा करार झाला. ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्सचे दुष्काळ व्यवस्थापन हे जगात आदर्श मानले जाते. तेथील शेती आणि जलसंधारणाचा अनुभव महाराष्ट्रासाठी उपयुक्त




ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

या करारानुसार केवळ दुष्काळ व्यवस्थापनच नव्हे, तर वित्तीय सेवा, स्वच्छ ऊर्जा, प्रगत उत्पादन, महत्त्वपूर्ण खनिजे, कृषी तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रातही दोन्ही राज्ये एकत्र काम करणार आहेत. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित राज्य बनवण्याच्या उद्दिष्टाशी ही भागीदारी सुसंगत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.मुंबई आणि सिडनी ही दोन्ही देशांची आर्थिक प्रवेशद्वारे असल्याने ऑस्ट्रेलियन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले. राज्यातील वाहतूक, औद्योगिक कॉरिडॉर, शाश्वत ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कराराला केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्षात आणण्यासाठी ९० दिवसांत संयुक्त कार्यगट स्थापन केला जाणार आहे. हा कार्यगट दोन्ही बाजूंच्या जबाबदाऱ्या निश्चित करून प्रकल्पांचा आढावा घेणार आहे. मराठवाडा आणि विदर्भासाठी हा ऑस्ट्रेलियन प्रयोग कितपत दिलासा देणारा ठरतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**काय आहे न्यू साउथ वेल्सचे तंत्रज्ञान?**

ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स राज्य दुष्काळ व्यवस्थापनात अग्रेसर आहे. उपग्रह आधारित जलसाठा निरीक्षण, कमी पाण्यातील स्मार्ट शेती, ड्रिप-आधारित जलसंधारण आणि हवामान-आधारित पीक सल्ला हे त्यांच्या तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्य आहे.

**सीजेपीमध्ये फूट**
## मनीष ब्रह्मभट्ट यांचा नवा पक्ष-सीजेपी-डी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) माजी स्वयंसेवक मनीष ब्रह्मभट्ट यांनी बंडखोरी करत नवा पक्ष स्थापन केल्याची घोषणा केली आहे. दिल्लीत पत्रकार परिषद घेत त्यांनी नव्या पक्षाचे नाव कॉकरोच जनता पार्टी - डेमोक्रॅटिक असल्याचे जाहीर केले.



यावेळी ब्रह्मभट्ट यांनी सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्यावर गंभीर आरोप केले. जंतरमंतर आंदोलनाशी संबंधित जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केले जात असून, तरुणांचे मुद्दे घेऊन सुरू झालेले आंदोलन आता एका विशेष राजकीय टीमच्या हातात गेले आहे, असा आरोप त्यांनी केला. सीजेपीचा कल आम आदमी पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांच्याकडे असून, टीममधील आठ जणांचे आपशी संबंध (पान ४ वर)

# शाळा वाचवा, पण शाळेत घुसू नका!

अग्रलेख

करण नवले

समाज व्यवस्थेमध्ये युवकांना नेहमीच अधिक महत्त्व राहिले आहे. देशाचे भविष्य हे शाळांच्या चार भिंतीत घडते, आणि त्या भविष्याला दिशा देण्याचे काम युवाशक्ती करते. म्हणूनच राजकीय प्रवास नेहमीच युवाशक्तीवर केंद्रीत असतात. अलीकडच्या काळात कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनांना मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर देशातील सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष पुन्हा एकदा युवकांकडे वळले आहे. राहुल गांधी यांनी पुण्यात विद्यार्थिनींशी संवाद साधला, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातून युवकांशी थेट हितगूज केले. याच पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके यांनी एक पाऊल पुढे टाकत 'स्कूल ठीक करो' अभियान सुरू केले. हेतू चांगला होता, सरकारी शाळांमधील त्रुटी, शौचालयाची दुरवस्था, पिण्याच्या पाण्याचा अभाव, निकृष्ट मध्यान्ह भोजन उघड करणे. या अभियानामुळे अनेक कार्यकर्ते, यूट्यूबर्स, सोशल मीडियावरील रीलबाज थेट शाळांमध्ये जाऊ लागले. हातात मोबाईल, लाईव्ह स्ट्रिमिंग सुरू आणि शिक्षकांना जाब विचारण्याचा प्रकार सुरू झाला. लखनऊच्या एका शाळेत परवानगीशिवाय घुसून यूट्यूबरने शिक्षकांवर दबाव टाकल्याची घटना तर या वादाचा ठिणगी ठरली. या पार्श्वभूमीवरच उत्तर प्रदेश आणि राजस्थान या दोन मोठ्या राज्यांच्या शिक्षण विभागांनी अत्यंत महत्त्वाचे आणि धाडसी आदेश काढले. राजस्थानने १६ ऑगस्ट २०२६ आणि उत्तर प्रदेशने १९ ऑगस्ट २०२६ रोजी अयोध्या आदेशाच्या धर्तीवर परिपत्रक काढून सरकारी शाळांमध्ये बाहेरील व्यक्ती, पत्रकार, यूट्यूबर्स, सोशल मीडिया चालवणारे आणि स्वयंघोषित समाजसेवक यांच्या प्रवेशावर बंदी घातली. शाळा परिसरात फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी, मुलाखत, ऑडिओ रेकॉर्डिंग आणि लाईव्ह स्ट्रिमिंगलाही मनाई करण्यात आली. शिक्षणाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय आता कोणीही शाळेत प्रवेश करू शकणार नाही. या आदेशाला काहींनी मौलिक अधिकारांवर घाला म्हणून सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. संविधानाच्या अनुच्छेद १४, १९, २१ आणि २१-ए अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचे हे उल्लंघन आहे, शाळेतील स्थितीचे स्वतंत्र दस्तऐवजीकरण केल्याने सत्य बाहेर येईल, असा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक अराधे यांच्या पीठाने मंगळवारी ही याचिका फेटाळून लावली. ''आम्ही अनुच्छेद ३२ अंतर्गत या याचिकेवर सुनावणी करण्यास इच्छुक नाही'', असे स्पष्ट शब्दात कोर्टाने सांगितले. वकील नरेंद्र मिश्रा यांनी दाखल केलेली ही याचिका फेटाळली गेल्याने आता दोन्ही राज्यांचे आदेश कायम राहणार आहेत. हा निकाल केवळ दोन राज्यांपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेसाठी एक दिशा देणारा आहे.खरे तर येथे दोन परस्परविरोधी मूल्यांचा संघर्ष आहे. एकीकडे पारदर्शकतेचा आग्रह आणि दुसरीकडे शाळेचे पावित्र्य. सरकारी शाळा या काही प्रदर्शनाच्या वस्तू नाहीत. तिथे ६ ते १४ वयोगटातील निरागस मुले शिकत असतात. त्यांच्या एकाग्रतेचा, त्यांच्या सुरक्षिततेचा आणि त्यांच्या बालमानसशास्त्राचा विचार करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे. आज कोणीही उठते, शाळेत घुसते, मुलांना प्रश्न विचारते, शिक्षकाचा व्हिडीओ काढून त्याला सोशल मीडियावर ट्रोल करते. यामुळे शिक्षण सुधारते का, तर अजिबात नाही. उलट शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण तयार होते. शाळा ही प्रयोगशाळा नाही आणि शिक्षक हा आरोपी नाही. 'स्कूल ठीक करो' सारख्या अभियानाचा हेतू जरी चांगला असला, तरी त्याची पद्धत चुकीची ठरत होती. शाळा ठीक करायची असेल तर ती प्रशासनाच्या माध्यमातून, शिक्षण विभागाच्या माध्यमातून, पालक-शिक्षक संघाच्या माध्यमातून ठीक करावी लागेल. कॅमेरा घेऊन वर्गात घुसून, मुलांच्या तोंडावर माईक लावून शाळा ठीक होत नसते. ती अधिकच डिस्टर्ब होते. देशभरात रील्स बनवण्याच्या नादात शालेय शिक्षण विस्कळीत होण्याची जी भीती व्यक्त होत होती, ती रास्त होती. सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळताना हेच अधोरेखित केले आहे. प्रत्येक प्रश्न हा मौलिक अधिकाराच्या चौकटीत बसवून न्यायालयात आणता येत नाही. शाळेत प्रवेश हा काही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भाग होऊ शकत नाही. शाळा ही संवेदनशील जागा आहे. तिथे शिस्त, सुरक्षा आणि एकाग्रता या तीन गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत. या निकालाचा सर्वात मोठा फटका अभिजीत दीपके यांच्या अभियानाला बसला आहे, हे खरे. पण त्यांनीही यातून बोध घेण्याची गरज आहे. युवाशक्तीचा वापर हा विधायक कामासाठी व्हायला हवा, विध्वंसक प्रसिद्धीसाठी नव्हे. शाळांची स्थिती खरच सुधारायची असेल तर माहिती अधिकारातून माहिती मागा, शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन द्या, लोकप्रतिनिधींना जाब विचारा. पण थेट वर्गात घुसून शिक्षणाच्या मुळावर घाव घालू नका.राजस्थान आणि उत्तर प्रदेशने घालून दिलेला आदर्श आता महाराष्ट्रासह इतर राज्यांनीही घेण्याची गरज आहे. शाळा वाचवायच्या असतील, तर आधी शाळांना यूट्यूबर्सच्या झुंडीपासून आणि राजकीय स्टंटबाजीपासून वाचवावे लागेल. हाच या निकालाचा खरा अर्थ आहे आणि हिच आजच्या शिक्षण क्षेत्राची सर्वात मोठी गरज आहे.

# दिगंबर जैन समाज श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी संजय कासलीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र झांजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : दिगंबर जैन समाज श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी संजय कासलीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र झांजरी ,सेक्रेटरी नितीनकुमार मिरीकर ,खजिनदार महावीर पाटणी यांची एकमताने निवड करण्यात आली.

दिगंबर जैन समाजाची सर्वसाधारण सभा समाजाचे जेष्ठ सदस्य नंदलाल पापडीवाल यांच्या अध्यक्षतेखाली दिगंबर जैन मंदिर श्रीरामपूर येथे पार पडली. यावेळी नवीन विश्वस्त मंडळाची समाजाने बिनविरोध निवड केली. यामध्ये नवीन विश्वस्तमंडळात संजय कासलीवाल, संजय चुडीवाल, नितीन मिरीकर ,राजेंद्र झांजरी, महावीर पाटणी, प्रकाश धोंडीराम पांडे, मयूर पाटणी ,विक्रांत गंगवाल, योगेश नंदलालजी गंगवाल ,सुनील बाकलीवाल, मनोज पापडीवाल या सर्वांची बिनविरोध एकमताने निवड करण्यात आली. सल्लागार पदी अॅड. भागचंद चुडीवाल ,सतीश गोधा, अनिल पांडे , गुलाब झांजरी, सुमित काला यांचे निवड करण्यात आली तर कायदेशीर सल्लागारपदी अॅड. सुहास चुडीवाल, अॅड. सुशील पांडे ,अॅड. अमोल मिरीकर ,प्रसिद्ध प्रमुखपदी मयूर पांडे, मनीष पांडे यांचे निवड करण्यात आली आहे.






# डाक पिंपळगावात शेती शाळा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील डाग पिंपळगाव येथे तालुका कृषी विभाग वैजापूरच्या वतीने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत कापूस शेती शाळा घेण्यात आली .

तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात विविध पिकांच्या शेतीशाळा सुरू आहेत.

शेतीशाळेत मंडळ कृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी कपाशीवरील रसशोषक किडी , बोंड अळी व किडींची नुकसान पातळी व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन केले तसेच कपाशी पिकात जैविक पद्धतीने ट्रायकोकार्ड लावण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.जैविक पद्धतीत ट्रायकोकार्ड लावल्याने ट्रायकोग्रामा चे पतंग बाहेर पडून बोंड अळीच्या अंड्यांमध्ये अंडी घालून त्या स्थितीतच बोंड अळीचे जैविक पद्धतीने नियंत्रण करण्याविषयी मार्गदर्शन केले.



समूह सहाय्यक अर्चना सानप यांनी कपाशी पिकातील सापळा पिकांचे फायदे ,मित्रकिडी व शत्रूकिडी विषयी माहिती दिली .व शेतकरी बांधवांना ट्रायकोकार्ड कपाशीमध्ये लावण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

सदरील शेती शाळेला सरपंच दीपक रोठे,किरण राशिनकर, दत्तू रोठे ,बाळासाहेब पवार ,राजेंद्र रोठे, नारायण झिंजुर्डे ,भगवान रोठे,बाबुराव गाडे ,भागिनाथ गाडे ,अशोक कोल्हे ,अरुण पंडित ,सचिन शेजवळ, कृषीताई शारदा रोठे ,शोभा जाचक ,अनिता गाडे,सुनिता गाडे, भगवान लवांडे ,गणेश तुपे सह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळसदृश परिस्थितीतही भगवानगडाची विहीर तुडुंब

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भगवानगड** : पावसाने गेल्या दोन महिन्यांपासून दडी मारल्याने परिसरात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असतानाही श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायथ्याशी असलेली विहीर तुडुंब भरलेली आहे. नागलवाडी-बोधेगाव रस्त्यालगत डोंगराच्या कुशीत असलेल्या या विहिरीची पाणीपातळी सातत्याने टिकून असून, उलट वाढत असल्याने परिसरात कुतूहल निर्माण झाले आहे.



भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू आहे. तसेच दररोज अखंड अन्नदान सुरू असून, गोशाळेतील गोधनासाठीही मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. या सर्व कामांसाठी याच विहिरीतील पाण्याचा वापर केला जात असूनही पाणीपातळीत घट होत नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. दरम्यान, विहिरीच्या पाणीपातळीची माहिती सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर दररोज हजारो भाविक व नागरिक विहीर पाहण्यासाठी येथे गर्दी करीत आहेत. विशेष म्हणजे या विहिरीपासून अवघ्या दीडशे फुटांवर असलेली खासगी विहीर मात्र जवळपास कोरडी पडली आहे. त्यामुळे दोन्ही विहिरींच्या पाणीपातळीतील फरक चर्चेचा विषय ठरला आहे.या विहिरीला पाण्याचा नैसर्गिक स्रोत कोणता, याचा शास्त्रीय अभ्यास झाल्यास पाणी टिकून राहण्यामागील नेमके कारण स्पष्ट होऊ शकते. संत भगवानबाबांच्या आध्यात्मिक परंपरेशी भगवानगडाचे असलेले नाते लक्षात घेता, अनेक भाविक या पाण्याला संतांची कृपा व निसर्गाची साथ मानत आहेत.

# 'उंडे पाटील फर्निचर मॉल'चा आज भव्य शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : घरातील फर्निचर, लाईट हाऊस, इंटिरियर डेकोरेशन आणि इव्हेंट मॅनेजमेंट या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या 'उंडे पाटील फर्निचर मॉल'चा भव्य शुभारंभ आज शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे.

या नव्या दालनामध्ये घरासाठी आवश्यक असलेले आधुनिक व आकर्षक फर्निचर, विविध प्रकारचे इंटिरियर डेकोरेशन साहित्य, लाईट हाऊस तसेच इव्हेंट मॅनेजमेंटशी संबंधित सेवा ग्राहकांना उपलब्ध होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. घरात मराठी पाऊल आणि फर्निचर विश्वात नवे पाऊल या संकल्पनेवर उभारण्यात आलेला हा मॉल श्रीरामपूर परिसरातील ग्राहकांसाठी एक नवा पर्याय ठरणार आहे.

शुभारंभ सोहळ्यास श्री क्षेत्र शिरसगावचे योगी महंत नीलकंठगिरी महाराज तसेच श्री क्षेत्र उंबरगावचे आचार्य श्री शुभम महाराज कांडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

अशोक पेट्रोल पंपाजवळ, नेवासा रोड, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे हा भव्य फर्निचर मॉल सुरू होत असून, शुभारंभाच्या निमित्ताने ग्राहक, नागरिक आणि हितचिंतकांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन बाळासाहेब पाटील उंडे, राजेंद्र उंडे आणि हरीश उंडे यांनी केले आहे.

# चितळवेढे: निसर्गाने सजलेले, संस्कारांनी घडलेले गाव....

१५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी आणि माझे पत्रकार मित्र अर्जुन भाऊ राऊत यांनी निळवंडे धरणाच्या पायथ्याशी वसलेल्या, निसर्गाने मुक्तहस्ते सौंदर्याची उधळण केलेल्या अकोले तालुक्यातील चितळवेढे या छोट्याशा, टुमदार गावाला भेट दिली.गावाच्या शिवारात प्रवेश करताच सह्याद्रीच्या कुशीत विसावलेले हे गाव प्रथमदर्शनीच मनाला मोहून टाकते. हिरव्यागार डोंगररांगा, खळाळणारे पाण्याचे प्रवाह, दऱ्याखोऱ्यांत पसरलेली हिरवाई आणि धुक्याची चादर यामुळे निसर्गाने जणू या गावाला आपल्या कुशीत अलगद घेतले आहे, असेच वाटते.स्वातंत्र्यदिनाचा उत्साह आणि सभोवतालच्या निसर्गाचे लोभस रूप यामुळे हा दिवस आमच्यासाठी अविस्मरणीय ठरला. मात्र या भेटीचे खरे वैशिष्ट्य केवळ निसर्गसौंदर्य नव्हते. या गावाची खरी ओळख आम्हाला झाली ती तेथील निसर्गसंपदा, संस्कारक्षम विध्यार्थी, उत्कृष्ट जिल्हा परिषद मराठी शाळा आणि ग्रामीण भागात उभा राहिलेला छोटासा पण अर्थपूर्ण उद्योग. शाळेच्या केंद्रप्रमुख श्रीमती स्वाती अडाणे मॅडम यांनी आम्हाला खास स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. कार्यक्रमाला दिलेल्या वेळेनुसार सुरुवात झाली. गावचे सरपंच, शालेय शिक्षण विभागाचे प्रमुख, ग्रामपंचायत सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, संपूर्ण शिक्षकवर्ग तसेच गावातील महिला आणि पुरुष मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते ते चिमुकल्या मुलींचे अप्रतिम सूत्रसंचालन!कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच राष्ट्रगान, राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत आणि ध्वजगीतांनी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला. त्यानंतर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव, राजकारण, भ्रष्टाचार आणि नागरिकांची जबाबदारी अशा विविध विषयांवर त्यांनी मांडलेले विचार ऐकताना आम्ही अक्षरशः भारावून गेलो. त्यांच्या वयाच्या मानाने विचारांची प्रगल्भता, आत्मविश्वास, वक्तृत्व आणि सादरीकरणाची पद्धत पाहून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होतीया मुलांच्या मागे केवळ शिक्षकांची मेहनत नाही, तर संपूर्ण गावाची संस्कारक्षम मानसिकता उभी आहे.जवळपास दोन ते तीन तास चाललेल्या या कार्यक्रमामागे शाळेने केलेले अत्यंत काटेकोर आणि उत्कृष्ट नियोजन दिसत होते. एवढ्या लहान गावातील शाळेने आपल्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेला आत्मविश्वास आणि संस्कार निश्चितच कौतुकास्पद होते. असे गावातील सर्वच हुशार, सात्त्विक आणि संस्कारी मुले-मुली पाहिल्यावर संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांची अभंगवाणी आठवल्याशिवाय राहणार कशी?आपुलिया हिता असे जो जागता । धन्य माता पिता तयाची ।।कुळी कन्या पुत्र होती जी सात्विक । तयाचा हरिख वाटे देवा ।।ज्या कुळामध्ये सात्त्विक, सदाचारी आणि संस्कारी मुलगा किंवा मुलगी जन्माला येते, त्यांच्या सद्गुणी आचरणाने त्या माता-पित्यांचे जीवन धन्य होते. त्यांच्या संस्कारांचा आणि सद्वर्तनाचा आनंद केवळ आई-वडिलांनाच नव्हे, तर प्रत्यक्ष परमेश्वरालाही होतो, असा या अभंगाचा भाव आहे. पण चितळवेढ्याची गोष्ट एखाद्या एका मुलाची किंवा मुलीची नाही; एखाद्या एका कुटुंबाच्या संस्कारांचीही नाही. संपूर्ण गावच जणू संस्कारांची भूमी वाटते. गावातील प्रत्येक घरातून हुशार, कर्तृत्ववान, सात्त्विक आणि संस्कारी मुले-मुली घडताना दिसतात. म्हणूनच तुकाराम महाराजांच्या अभंगातील तयाचा हरिख वाटे देवा हा भाव येथे एका कुळापुरता मर्यादित राहत नाही. संपूर्ण गावातील मुला-मुलींचे सद्गुणी आचरण पाहून जणू प्रत्यक्ष देवालाच या गावाचा अभिमान, आनंद आणि कौतुक वाटत असेल!अशा गावाची खरी श्रीमंती केवळ शेती, संपत्ती किंवा भौतिक साधनांत नसते. त्या गावाची खरी संपत्ती म्हणजे तेथील संस्कार, माणुसकी, शिक्षण, सदाचार आणि पुढच्या पिढीला दिलेली मूल्यांची शिदोरी. अशा संस्कारी पिढीमुळे गाव धन्य होते, माता-पिता धन्य होतात आणि त्या गावची मातीही धन्य होते.मात्र या सुंदर शाळेसमोर आज एक महत्त्वाचे आव्हान आहेविद्यार्थी संख्या वाढवणे आणि त्यानुसार शिक्षकसंख्या वाढवणे. विद्यार्थ्यांची संख्या वाढली आणि पुरेसे शिक्षक उपलब्ध झाले, तर प्रत्येक विद्यार्थ्याकडे अधिक वैयक्तिक लक्ष देता येईल आणि गुणवत्ता व संस्कारांची ही परंपरा आणखी प्रभावीपणे पुढे नेता येईल.कार्यक्रम संपल्यानंतर गावातील इंजिनिअर तरुण सात्त्विक आरोटे आम्हाला आपल्या घरी चहा-नाश्त्यासाठी



घेऊन गेला. चहा-पाणी झाल्यानंतर त्याने शेजारीच स्वतःच्या पुढाकाराने सुरू केलेला शाळेचे गणवेश तयार करण्याचा ग्रामीण उद्योग आम्हाला दाखवण्यासाठी नेले. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या छोट्याशा गावात जवळपास ३५ ते ४० महिलांना रोजगार मिळवून देणारा हा उद्योग पाहून मला मनापासून आनंद झाला. गेली चार दशके मी स्वतः इंजिनिअरिंग उत्पादन क्षेत्रात शहरी भागात काम करत आलो आहे. त्यामुळे ग्रामीण भागात, तेही अशा दुर्गम गावात, उद्योग उभा करून स्थानिक महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे सात्त्विकचे काम मला विशेष भावले. सात्त्विक केवळ ३५-४० महिलांना रोजगार देत नव्हता; तर त्या महिलांच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना रोजगाराच्या शोधात शहरांकडे स्थलांतर करण्यापासून रोखत होता. त्याचा हा छोटासा उद्योग अप्रत्यक्षपणे गावातील शाळेच्या पटसंख्येलाही आधार देत होता. कारण कुटुंबे गावात टिकली, तर मुलांचे शिक्षणही गावातच सुरू राहते.एका छोट्याशा उद्योगाचा गावाच्या सामाजिक आणि शैक्षणिक जीवनावर किती मोठा परिणाम होऊ शकतो, याचे हे सुंदर उदाहरण होते. सात्त्विकचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. त्याला पुणे-मुंबईसारख्या शहरांमध्ये सहजपणे चांगली आणि कायमस्वरूपी नोकरी मिळू शकली असती. पण शहराकडे जाण्याऐवजी त्याने स्वतःच्या गावातच रोजगार निर्माण करण्याचा मार्ग निवडला. स्वतःच्या करिअरसोबत आपल्या गावाच्या भविष्याचाही विचार करणारा हा दृष्टिकोन निश्चितच प्रेरणादायी आहे.ग्रामीण भागात उद्योग उभा करणे शहराच्या तुलनेत अजिबात सोपे नाही. बाजारपेठ, वाहतूक, वीज, भांडवल, कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान आणि इतर अनेक अडचणी उद्योजकासमोर असतात. तरीही या अडचणींवर मात करून गावातच रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे सात्त्विकसारखे तरुण निश्चितच कौतुकास पात्र आहेत.असे तरुण गावोगावी निर्माण झाले, तर रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर निश्चितच कमी होईल. गावातील अर्थव्यवस्था मजबूत होईल, शाळा टिकतील, कुटुंबे गावातच राहतील आणि सह्याद्रीच्या कुशीतली ही गावे पुन्हा एकदा स्वयंपूर्ण आणि समृद्ध होतील. खरं तर, गावात उद्योग उभा करणे म्हणजे केवळ उत्पादन करणे नव्हे; तर गावात रोजगार, कुटुंबात उत्पन्न, मुलांच्या शिक्षणाला आधार आणि संपूर्ण गावाला भविष्य देणे होय. सात्त्विक आरोटेने आपल्या छोट्याशा प्रयत्नातून हेच करून दाखवले आहे.चितळवेढे येथील स्थानिक शेतीसोबतच गावातील जलसंधारणाच्या कामात सक्रिय असलेले शेतकरी बाळासाहेब आरोटे यांच्या सोबत आम्ही शेतशिवार फेरीसाठी निघालो. ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेताना निसर्गाने या गावाला दिलेले वैभव जवळून पाहण्याची संधी मिळाली. सर्वप्रथम दुथडी भरून वाहणाऱ्या प्रवरा नदीचे मनोहारी दर्शन घेतले. पावसाळ्यामुळे नदीला आलेला पूर पाहताना तिचे रौद्र आणि लोभस असे दोन्ही रूप एकाच वेळी अनुभवायला मिळत होते. त्यानंतर आमचा मोर्चा गावाजवळच असलेल्या एका सुंदर धबधब्याकडे वळला.पावसाळ्याच्या दिवसांमुळे संपूर्ण शिवार हिरवाईने नटले होते. डोंगरकपारीतून खळाळत खाली येणारे झरे, भरभरून वाहणारे नाले, दुथडी भरून वाहणारी प्रवरा आणि चहूबाजूंनी पसरलेली हिरवळया सगळ्यामुळे चितळवेढ्याचे निसर्गचित्र अक्षरशः जिवंत झाले होते. गावाच्या अगदी लगत उभ्या असलेल्या हिरव्यागार डोंगररांगांनी या सौंदर्यात आणखी भर घातली होती.समोर दिसणारे निळवंडे धरण, त्याच्या सभोवताली पसरलेल्या डोंगररांगा, हिरवीगार शेती आणि पावसाळ्यात जागोजागी निर्माण झालेले जलप्रवाह हे दृश्य मन मोहून टाकणारे होते. या परिसराकडे थोड्या व्यापक दृष्टीने पाहिले, तर चितळवेढ्याच्या विकासाची एक सुंदर शक्यता जाणवते.गावाभोवतीच्या डोंगरांवर स्थानिक आणि विविध प्रजातींच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करून, जलसंधारणाची कामे अधिक बळकट करून आणि नैसर्गिक धबधबे, झरे, नदीकाठ व डोंगररांगांचे योग्य पद्धतीने संवर्धन केले, तर चितळवेढे केवळ सुंदर गाव राहणार नाही, तर सह्याद्रीतील एक आकर्षक बारमाही पर्यटनस्थळ म्हणूनही विकसित होऊ शकते.निसर्गाचे संवर्धन, शेतीचा विकास, जलसंधारण आणि स्थानिक युवकांना रोजगारया चारही गोष्टींची सांगड घालणारे हे गाव भविष्यात 'निसर्ग पर्यटनाचे आदर्श गाव' बनू शकते. मात्र त्यासाठी विकासाचा मार्ग निसर्गाच्या मुळावर उठणारा नसून, निसर्गाशी सुसंवाद साधणारा असायला हवा. गावकऱ्यांचा सहभाग, स्थानिक संसाधनांचा सुयोग्य वापर, स्वच्छता, पाण्याचे संवर्धन, वृक्षलागवड, स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ आणि जबाबदार पर्यटन यांचा समन्वय आवश्यक आहे. गरज आहे ती या नैसर्गिक संपत्तीचे जतन करण्याची, तिचे सुयोग्य नियोजन करण्याची आणि गावकऱ्यांच्या सहभागातून तिचा विकास करण्याची.चितळवेढ्याकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते निसर्गाने गावाला सौंदर्य दिले आहे; आता माणसाने त्या सौंदर्याचे संवर्धन करून त्याला विकासाची दिशा द्यायची आहे.येथे निसर्ग आहे, पाणी आहे, शेती आहे, संस्कार आहेत, शिक्षण आहे आणि गावातच रोजगार निर्माण करण्याची उमेद असलेले सात्त्विकसारखे तरुणही आहेत. म्हणूनच चितळवेढे हे केवळ सह्याद्रीच्या कुशीतले एक सुंदर गाव नाही. ते एक विचार आहे.एक असे गाव, जिथे निसर्ग आणि विकास एकमेकांचे विरोधक नसून सहप्रवासी होऊ शकतात ; जिथे शिक्षणातून संस्कार घडतात, उद्योगातून रोजगार निर्माण होतो, जलसंधारणातून शेतीला आधार मिळतो आणि निसर्गसंवर्धनातून पर्यटनाची नवी दारे खुली होऊ शकतात.गावातील शाळा संस्कारांची पेरणी करेल,शेतकरी जमिनीशी नाते घट्ट ठेवेल,उद्योग गावात रोजगार निर्माण करेल,जलसंधारण भविष्यातील पाण्याची हमी देईलआणि सह्याद्रीचा निसर्ग पुढच्या पिढ्यांसाठी जपला जाईलतर चितळवेढे खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होईल चितळवेढ्याची ही भेट माझ्यासाठी केवळ एका गावाची भेट नव्हती; ती होती एका सुंदर ग्रामीण भविष्याची झलक पाहण्याचा अनुभव.सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाने सजवलेले हे गाव संस्कारांनी घडले आहे आणि स्वावलंबनाच्या दिशेने पावले टाकत आहे.चितळवेढ्याकडे पाहताना मनात एकच विचार येतो निसर्गाने दिलेले वैभव जपले, संस्कारांची शिदोरी पुढे नेली आणि गावातच रोजगार निर्माण केला, तर खऱ्या विकासासाठी शहरांकडे पाहण्याची गरजच काय?

---------



**भिला सोनू पाटील**
**जल प्रहरी पुरस्कार विजेते**
**जल शक्ती मंत्रालय, भारत सरकार**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# समाजसेवेचे बाळकडू आम्हाला बाबांकडूनच मिळाले : डॉ. प्रकाश आमटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : नागपुरला वैद्यकीय शिक्षण पुर्ण केल्यावर बाबांनी जंगलातील लोक कसे बिकट आयुष्य कसे जगतात, त्यांची जगण्याची धडपड आम्हाला दिसावी या हेतूने वनसहलीसाठी हेमलकसा या आदीवासी भागात नेले होते. तिथे आदीवासी लोकांची परिस्थिती पाहून मन हेलावले आणि तेव्हाच मी ठरवले की मला या लोकांसाठी काही तरी करायचे आहे. लग्नाच्या वेळी दिलेल्या शब्दाला जागून माझी पत्नी डॉ. मंदाकिनी हिनेही अपार कष्ट घेतले, म्हणून ही सेवा उभी राहू शकली असे प्रतिपादन हेमलकसा येथील ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले.

प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस या अभिमत विद्यापीठातील डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालायातील विद्यार्थी परिषदेच्या वतिने आयोजीत मानवता, करूणा आणि सेवा या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी डॉ. मंदाकिनी आमटे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ह.एन.मगरे, अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन यांनी प्रास्तविक केले. आठवणींना उजाळा देताना डॉ. आमटे म्हणाले, समाजसेवेचे बाळकडू आम्हाला बाबांकडूनच मिळाले. मी जेव्हा हेमलकसा येथे गेलो तेव्हा तेथील आदिवासी लोकांनी कपडे घातलेली माणसे पाहिलीच नव्हती, आमची गाडी तिथे पोहोचल्यावर ती माणसे घाबरून पळून गेली.

परंतू आम्ही जिद्दीने त्यांच्याशी जुळवून घेवून त्यांच्यामध्ये हळूहळू मिसळलो आणि त्याचीं बिकट परिस्थिती



सुधारण्याचे ठरवीले आणि आजही हे समाजसेवेचे व्रत अव्याहतपणे सुरू आहे. २२ वर्षे तेथे वीज नव्हती. दिडशे किलोमिटरच्या परिसरात दवाखाना नव्हता. अशा बिकट परिस्थितीशी झुंज देत सेवेचे व्रत चालूच ठेवले. नंतर जेव्हा माझा मुलगा डॉक्टर झाला आणी त्यानेही याच सेवेचा वारसा पुढे चालविण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा बाबांच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू आले.

तिसरी पीढीही हेच काम करत असल्याचा त्यांना मोठे समाधान वाटल्याचे ते म्हणाले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्हि. एन.मगरे यांचे समारोप भाषण झाले. शिवम वाघमारे व श्रेयस कासार यांनी कार्यक्रमाचे नेतृत्व केले. विद्यार्थी प्रतिनिधी पृथ्विराज कवडे यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थी प्रतिनिधींनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## द•ख•ल

### ब्राम्हणी जिल्हा परिषद शाळेला वॉटर फिल्टर भेट



**राहुरी** : पीएमसीश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी मिळावे या उद्देशाने, सामाजिक बांधिलकी जपत क्रेडिट क्सेस ग्रामीण लि. फायनान्स यांच्याकडून ब्राम्हणीच्या शाळेला एक अत्याधुनिक 'वॉटर फिल्टर' मशीन भेट देण्यात आले आहे.या वॉटर फिल्टरचे उद्घाटन बुधवार २ सप्टेंबर रोजी सरपंच सुवर्णा बानकर,क्रेडिट क्सेस ग्रामीण लि. फायनान्सचे ज्ञानेश्वर कदम, रवींद्र रक्ताटे, प्रमोद गवांदे, संजय नांदवे, मयुर जाधव,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,मुख्याध्यापक,शिक्षक, आणि स्थानिक ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.यावेळी गेल्या अनेक दिवसांपासून शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची तीव्र गरज होती. हीच गरज ओळखून हा महत्त्वपूर्ण पुढाकार घेण्यात आला. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित राहणार,पावसाळ्यात आणि बदलत्या हवामानात दूषित पाण्यामुळे लहान मुलांना पोटाचे विकार व इतर आजार होण्याची शक्यता जास्त असते. या नवीन फिल्टर प्रणालीमुळे शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांना आता दररोज जंतूमुक्त आणि स्वच्छ पाणी उपलब्ध होणार आहे.

### संभाजीनगर येथे रविवारी अ.भा. गोंधळी समाज संघटनेची बैठक : कदम



**नेवासा** : रविवारी दि.६ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय गोंधळी समाज संघटनेच्या मराठवाडा विभाग बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीला मराठवाडा विभागातील संघटनेच्या सदस्यांनी व समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे प्रदेश सचिव बाबासाहेब कदम यांनी केले आहे.

कोकण, पश्चिम महाराष्ट्र विभाग बैठकी नंतर रविवार दि.०६ सप्टेंबर २६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत कबीर मठ नवापुरा जुना मोंढा येथे अखिल भारतीय गोंधळी संघटना संघटना' मराठवाडा विभागाची ही बैठक दुपारी ठीक २ वाजता, प्रदेश कार्यकारिणी पदाधिकारी आणि मराठवाड्यातील सर्व जिल्हा अध्यक्ष,जिल्हा पदाधिकारी यांची संयुक्त महत्त्वपूर्ण बैठक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र अण्णाराव वनारसे यांच्या प्रमुख उपस्थितीत व कमलाकर रेणुके यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत संघटनेचे पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

### साईबाबांच्या पालखी व दिंडीचे कोल्हार येथे स्वागत



**कोल्हार** : इंदापूर तालुक्यातील कुरवली येथून श्री बाळकृष्ण सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्री साई सेवा सामाजिक ट्रस्ट आयोजित कुरवली ते श्री क्षेत्र शिर्डी साई पालखी व पायी दिंडीचे श्री क्षेत्र कोल्हार भगवतीपुर येथे स्वागत करण्यात आले. पालखी येथील दीपक मंगल कार्यालयामध्ये आल्यानंतर श्री गंगाधर घुले दीपक घुले व घुले परिवारातील सदस्यांनी साई भक्तांचे स्वागत केले. डॉक्टर सुनिता वडीतके यांचे यावेळी प्रवचन झाले. त्यानंतर साईबाबांची महाआरती करण्यात आली दिंडीतील सहभागी साई भक्तांना यावेळी गंगाधर घुले यांच्या परिवाराच्या वतीने अन्नदान करण्यात आले यावेळी पालखी सोहळ्यातील साई भक्तांच्या वतीने गंगाधर घुले व दीपक घुले तसेच पत्रकार प्रमोद कुंभकर्ण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी यावेळी साईभक्त बाळकृष्ण सपकळ,रामचंद्र पोळ, भानुदास खंडागळे,सुनील माने विजय थोरात नीलम मोरे नवनाथ सूर्यवंशी विजय थोरात पद्माकर देशमुख प्रकाश काटे आधी सह साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. साई पालखी सोहळ्याचे हे अकरावे वर्ष आहे. कै. शालन अर्जुन चव्हाण यांचे स्मरणार्थ श्री अर्जुन नारायण चव्हाण यांनी अकरा दिवसाच्या फराळाची दिंडीतील साई भक्तांसाठी व्यवस्था केली आहे.

## मुठेवाडगांव सोसायटीच्या पुन्हा घेण्यात आलेल्या मासिक सभा शांततेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : मुठेवाडगांव सेवा सहकारी सोसायटीची ३१ तारखेला तहकूब करण्यात आलेली मासिक सभा आज ३ सप्टेंबर रोजी सर्व १३ सदस्यांचे ऊपस्थितीत चेअरमन सौ.व्दारका बाळकृष्ण मुठे यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली. सोसायटीच्या कार्यालयात चेअरमन द्वारका मुठे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होताच, प्रारंभी अशोक कारखान्याचे माजी संचालक बबन मुठे व कारेगांव भागचे व्हा.चेअरमन शिवाजी मुठे यांनी संस्थेचे सचिव दत्तात्रय जासुद यांना नऊ संचालकाचे लेखी निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की आम्ही विरोधी बाकावरील सर्व ९ सदस्य उपस्थित असून प्रोसिडिंगवर सह्या केलेल्या आहेत. अजेंडा वरील विषय क्रंमाक ४ सभासदांना कर्ज देणे हा विषय वगळता अजेंडा वरील बाकी विषयाला आमचा विरोध असल्याचे सांगितले. यावर संस्थेचे सचिव जासूद यांनी मी या निवेदनाची वरीष्ठाना माहिती देऊन मार्गदर्शन घेतो असे सांगितल्यावर सदस्यांनी त्यास मान्यता दिली. सचिवांनी सहाय्यक निबंधक कार्यालयाशी संपर्क साधून या घडामोडीची लेखी अर्जाची माहिती दिली. यावर सहाय्यक निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी अभिप्राय देताना म्हटले की बहुमत असलेल्या संचालकाचे निवेदन बरोबर असून विषय क्रंमाक ४ सभासदांना कर्ज देणे या विषय ला मंजूरी घेऊन बाकी विषयाला विरोध असल्याने ते घेऊ नये अशा सुचना सचिवास दिल्या. मासिक सभेच्या अध्यक्ष चेअरमन यांच्या कडे बहूमत नसल्याने अजेंडा वरील विषय त्यांना घेता आले नाही. चेअरमन सौ.मुठे यांच्यासह सह डॉ शंकर मुठे,भागवत मुठे, संभाजी गोसावी या अल्पमतातील चौघाह सदस्यांनाही अधिकाऱ्यांनी सचिवांना दिलेले आदेश मान्य करावे लागले. या निवेदनावर संस्थेचे व्हा.चेअरमन बबन मुठे, संचालक शिवाजी मुठे, सुभाष मुठे, भास्कर मुठे, रमेशभाऊ मुठे, अण्णासाहेब मुठे, सेवानिवृत्त प्रा.रंगनाथ कोळसे, तुकाराम रुपटक्के,सौ,शंकूतला संपत मुठे यांच्या सह्या आहेत.

### ९ सदस्यांचे बहुमतावर चालणार कारभार

मुठेवाडगांव ग्रामपंचायत पाठोपाठ सोसायटीची निवडणूक होणार असल्याने गावांत गट तटाचे राजकारण ढवळून निघाले आहे. सोसायटीत सत्ताधारी ४ विरूद्ध ९ असे समिकरण असले तरी तीन महिन्यांसाठी चेअरमन पद अबाधित ठेवण्याचा निर्णय बहुमत असलेल्या ९ सदस्यांनी घेतला असून, सद्याचे अधिकार चेअरमन यांना असले तरी अंमलबजावणी बहुमताचे निर्णयावर होणार आहे.

## विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रवरा शिक्षण संस्थेत 'सेंद्रिय किचन गार्डन' उपक्रम



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळणे ही आजच्या काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शेती, कौशल्य आणि श्रमसंस्कृतीशी जोडण्यासाठी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था सातत्याने नवनवीन प्रयोग राबवत आहे. संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात साकारलेले 'सेंद्रिय किचन गार्डन' विद्यार्थ्यांमध्ये शेतीची आवड निर्माण करणारे ठरले आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पारंपरिक शिक्षण आणि पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही.

विशेषतः ग्रामीण भागात शेतीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना शेतीची माहिती, उत्पादन तंत्रज्ञान, श्रमाचे महत्त्व आणि आधुनिक शेतीची ओळख व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जात आहेत. शाळेच्या आवारातच शेतीचे धडे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयां मध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि मार्गदर्शक यांच्या सहभागातून विविध प्रकारच्या भाजीपाला, फळपिके तसेच औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना पौष्टिक व दर्जेदार आहार मिळावा, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'सिंधू छाया सेंट्रल किचन' या संकल्पनेला या उपक्रमाची जोड मिळाली आहे. सेंट्रल किचनसाठी लागणारा भाजीपाला दर्जेदार असावा, यासाठी शाळा–महाविद्यालयांच्या परिसरातच विविध भाजीपाला पिकांची लागवड करण्यात आली आहे. प्रवरेच्या शैक्षणिक संकुलात विद्यार्थी, शिक्षक आणि कृषी तज्ज्ञांच्या सहभागातून साकारलेले हे सेंद्रिय किचन गार्डन त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. शिक्षणा बरोबरच प्रत्यक्ष श्रम, निसर्गाशी नाते, शेतीचे तंत्रज्ञान आणि कौशल्याचा अनुभव देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये 'शेतीकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची' दृष्टी निर्माण करीत आहे.

प्रवरेच्या शैक्षणिक परंपरेतून आकाराला येणाऱ्या या उपक्रमामुळे शाळेचा परिसरच विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा बनला असून, किचन गार्डन हे त्यांच्या हातातील शेतीचे प्रत्यक्ष पाठ्यपुस्तक ठरत आहे.

## भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर उपोषण दुसऱ्या दिवशी लेखी आश्वासनानंतर स्थगित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : शहरात गल्लोगल्ली वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नाबाबत सामाजिक कार्यकर्ते व जनसेवक शिवाभाऊ राजगिरे यांनी नेवासा येथील नगरपंचायत चौकात सू केलेले उपोषण दुसऱ्या दिवशी मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी तीन महिन्याच्या कालावधीत कारवाई करण्याचे दिलेल्या लेखी आश्वासनंतर स्थगित करण्यात आले. नगरपंचायतमार्फत सदर विषयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची वस्तुस्थिती आपल्याला निदर्शनास आणून देण्यात आलेली असून सबब, कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण बाबत नियमानुसार कार्यवाही पुढील तीन महिन्यांमध्ये करण्यात येईल असे लेखी आश्वासन मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी दिल्याने हे उपोषण दुसऱ्या दिवशी सोडण्यात आले.

दोन दिवसांपासून उपोषण सुरू असूनही नगरपंचायत प्रशासनाने कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने नेवासकर नागरीकांकडून संताप व्यक्त करण्यात येत होता. मोकाट कुत्र्यांचा नेवासा शहरात सुळसुळाट झाल्याने लहान शाळकरी मुलांसह सर्वसामान्य वृद्ध नागरिकांना ही रस्त्याने चालणे मुश्किल झाले होते याच मोकाट कुत्र्यांनी अनेकांना चावा घेतल्याच्या घटना ही घडलेल्या होत्या. राजगिरे यांनी दि.२ सप्टेंबरपासून नगरपंचायत चौकात वन मॅन शो प्रमाणे मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी उपोषण सुरू केले. गुरुवारी दि.३ सप्टेंबर रोजी उपोषणाचा दुसरा दिवस होता.

लेखी आश्वासनचे पत्र मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्या हस्ते उपोषणकर्ते शिवा राजगिरे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, उपनगराध्यक्ष सौ.शालिनीताई सुखदान,कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे,शांताराम गायके,संजय सुखदान, स्वीकृत नगरसेवक राजू काळे,नगरसेवक स्वप्नील मापारी, विकास चव्हाण, जालिंदर गवळी,विकास पोतदार,दीपक धोत्रे,रमेश डहाळे,रुपेश उपाध्ये,संदीप बेहळे,जयंत मापारी,अनिल सोनवणे,रणजित सोनवणे,मोहिनीराज सरगैय्ये,अभय वाघ यांच्यासह नागरिक उपस्थित होते

## हणमंतगावात धुमाकूळ घालणारा नरभक्षक बिबट्या अखेर जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : राहता तालुक्यातील हणमंतगाव, मोहटा देवी परिसर, फिरस्ती आई मंदिर व घोलप वस्ती परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर मंगळवारी रात्री १० वाजता वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाला.

बिबट्याच्या दहशतीमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या आठवड्यात बिबट्याने शेतात कपाशीवर औषध फवारणी करणारे मच्छिंद्र जेजुरकर यांच्यावर उसातून येऊन हल्ला केला होता. विलास जेजुरकर यांच्यावरही हल्ल्याचा प्रयत्न झाला. घोलप वस्तीवर बिबट्याने कोंबड्यांचा फडशा पाडला. रविवारी तर साडेतीन वर्षांच्या अद्विक घोलप या चिमुकल्यावर बिबट्याची नजर पडली होती. मात्र, साक्षी घोलप हिने प्रसंगावधान दाखवत अद्विकला सुरक्षित गोठ्यात नेल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी वनविभागाला बिबट्याचा बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर वनविभागाने पिंजरे, थर्मल ड्रोन व गस्त वाढवली.

अखेर अजिंक्य विलास घोलप यांच्या वस्तीवर लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला.

वनरक्षक प्रतीक गजेवर व प्राणीमित्र विकास म्हस्के यांनी त्याला सुरक्षितपणे हलविले.

### भोंग्याची शक्कल ठरली निर्णायक

प्राणीमित्र विकास म्हस्के यांनी शेळीच्या आवाजाचा भोंगा पिंजऱ्यात लावण्याची अनोखी पद्धत वापरली. या पद्धतीने यापूर्वीही दोन बिबट्यांना जेरबंद करण्यात आले असून, तिसऱ्यांदा ही शक्कल यशस्वी ठरली. दरम्यान, परिसरात आणखी एक बिबट्या दिसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रीरामपूरमध्ये स्कूल बस तपासणी मोहीम

### ३३ वाहनांवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : पोलीस ठाणे, वाहतूक शाखा विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी ( दि.३, सप्टेंबर) रोजी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत एकूण ६६ स्कूल बसेस व वाहनांची तपासणी करण्यात आली. वाहनांचे फिटनेस, परवाना, विमा, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी, आपत्कालीन दरवाजा आणि चालकांची कसून तपासणी करण्यात आली.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामध्ये विना युनिफॉर्म, अतिरिक्त प्रवासी, अग्निशामक यंत्र व प्रथमोपचार पेटीचा अभाव असणाऱ्या वाहनांचा समावेश आहेत. शहरात पहिल्यांदाच असा विशेष ड्राईव्ह राबविल्याने काही चालकांना समज देऊन सोडण्यात आले. मात्र, यापुढे कारवाई अधिक तीव्र केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला असून पालकांनी व शाळा प्रशासनाने सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहेत.

## अवैध गुटखा विक्रीबाबत आ. प्राजक्त तनपुरे आक्रमक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यात मोठ्या प्रमाणात गुटखा व सुगंधी तंबाखूची अवैध विक्री व तस्करी सुरू असल्याचा आरोप करीत माजी मंत्री तथा आमदार प्राजक्त तनपुरे यांनी पोलिस प्रशासनावर ताशेरे ओढले असून यासंदर्भात पोलिसांनी काय कारवाई केली असा सवाल उपस्थित केला आहे. राहुरी तालुक्यातील गुटखा विक्री प्रकरणाचा सखोल तपास करून अशा आरोपींना तडीपार करण्याची मागणी माजीमंत्री आ. प्राजक्त तनपुरे यांनी केली. या विषयावर ऑनलाइन घेतलेल्या पत्रकार परिषदेत आमदार तनपुरे यांनी माहिती दिली. दोन दिवसांपूर्वी स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी तालुक्यातील दोन ठिकाणी कारवाई केली. या कारवाईत गुटखा व सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त करण्यात आला. म्हैसगाव येथील गागरे तसेच राहुरी खुर्द येथील पवन गिरासे यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांचा तपास राहुरी पोलिसांकडे सोपविण्यात आला आहे. तसेच हे आरोपी राहुरी पोलीसांच्या ताब्यात आहेत. त्यांची कसून चौकशी होणे गरजेचे आहे. गुटखा कुठून येतो आणि कोणाच्या माध्यमातून तालुक्यात वितरित केला जातो? या मूळ प्रश्नापर्यंत पोलिसांनी गांभीर्याने तपास केला पाहिजे, अशी आक्रमक भूमिका आ. तनपुरे यांनी घेतली. राहुरी खुर्द येथील पवन गिरासे याच्यावर यापूर्वीही गुटखा तस्करीसंदर्भात गुन्हे दाखल असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.


### जाहीर नोटीस

दिनांक ०३/०९/२०२६

तमाम लोंकाना या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल यांनी दिलेल्या माहिती वरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहीर नोटीस देण्यात येते की, मौजे मुकिंदपुर ता. नेवासा येथील शेत जमिन गट नंबर ७/१/२ यापैकी क्षेत्र ० हे २८ आर आकार ०.२० पैसे हे संपुर्ण क्षेत्र याची चतुर्सिमा रेकॉर्ड प्रमाणे सदर मिळकत ही आमचे अशिलाने विक्रीस काढली असून सदर मिळकती बाबत कोणत्याही इसमाचे अगर व्यक्तीचे गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, आरक्षण, नोटरी, वारस व कोर्ट कारवाई, बैंक कर्ज, पतसंस्था, फायनान्स, सावकारकी व इतर कुठल्याही शासकिय अगर निमशासकिय कर्ज बोजे, सोसायटी बोजा अगर इतर कोणतेही कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आमच्या खालील पत्त्यावर लेखी हरकती नोंदवून त्याबाबत योग्य त्या कागदपत्रासह व पुराव्यानिशी संपर्क साधून आमचे अशिलाची खात्री पटवून द्यावी. सदर मिळकती बाबत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमुद मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही काहीएक हरकत घेतली जाणार नाही.

ही जाहीर नोटीस दिले असे
नेवासा
दिनांक ०३/०९/२०२६

**ॲड. अशोक गंगाधर करडक पा.**
**नेवासा ता. नेवासा जि.अ.नगर**
**मो न. ९८५०८५५७०१**



### जाहिर नोटीस

प्रो.फी.रु.
पान नं.
ता.०२/०९/२०२६

श्री.एस.ए. हासे
ॲडव्होकेट, संगमनेर
नि. नं.

**मे. उपविभागीय अधिकारी साहेब संगमनेर यांचे कोर्टात**

आर.टी.एस.नं.
४२०/२०२६

सिताराम मुरलीधर ढमाले---**अपेलंट**
विरुध्द
मंडळ अधिकारी, वगैरे---**रेस्पॉडंट**
प्रती,
**रेस्पॉंडंट नं. ३) प्रतिभा सोमनाथ वालझाडे..**
**रा. जनतानगर ता. संगमनेर**
**जि. अहिल्यानगर**
यांना

ज्याअर्थी वरील अपेलंट यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये अपिल दाखल केले आहे. त्या अपिलात तुम्ही रेस्पॉंडंट नं. ३) प्रतिभा सोमनाथ वालझाडे, रा. जनतानगर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर, म्हणुन सामिल आहात. सदर अपिलाचे रेस्पॉडंट नं. ३ यांना वरील पत्यावर समन्स बजावणी होत नाही.

त्याअर्थी या नोटीसने आपणास कळविण्यात येते की, सदर आरटीएस अपील नं. ४२०/२०२६ चे कामकाजासंदर्भात स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. ०७/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा. मे. उपविभागीय अधिकारी साहेब, संगमनेर येथे सुनावणीचे कामी हजर रहावे असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येते आहे.

तसेच या नोटीसने आपणास असेही कळविण्यात येते की, वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दि.०२/०९/२०२६ रोजी माझे सही / शिक्क्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - संगमनेर
दि. ०२/०९/२०२६.

कामगीरी क्लर्क | शिक्का | **उप. विभागीय अधिकारी संगमनेर भाग संगमने करिता**

# सौरऊर्जा प्रकल्प झाला तरीही 'अंधार' कायम!

## जेऊर पंचक्रोशीत रात्री वीज गायब; वाड्या-वस्त्यांवर भीतीचे सावट

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** घुरुडी डोंगरावर सौरऊर्जा प्रकल्प उभा राहिल्यानंतर जेऊर परिसरातील नागरिकांना चोवीस तास वीजपुरवठ्याची अपेक्षा होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी वारंवार वीज गायब होत असल्याने नागरिकांच्या या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. वाड्या-वस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य पसरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घुरुडी डोंगरावरील सौरऊर्जा प्रकल्प सुरू करताना परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम होऊन चोवीस तास वीज उपलब्ध होईल असा दावा करण्यात आला होता. त्यामुळे या प्रकल्पामुळे विजेच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघेल अशी आशा ग्रामस्थांना होती. मात्र सध्या परिस्थिति उलट असल्याचे चित्र आहे.

**अंधार पडताच बिबट्याची धास्ती !**

वीज खंडित होताच शेतकरी, महिला आणि वाड्या-वस्त्यांवरील नागरिकांची चिंता वाढली आहे. परिसरात यापूर्वी बिबट्याचे दर्शन झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर अंधारात घराबाहेर पडणेही नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

महावितरणच्या जेऊर उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या अनेक गावांमध्ये रात्रीच्या वेळी वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. विशेषतः रात्रीच्या अंधारात वीज गायब होत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतकरी आणि वाड्या-वस्त्यांवरील रहिवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

जेऊर परिसरात यापूर्वी अनेकदा बिबट्याचे दर्शन झाले आहे. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी परिसर अंधारात राहणे धोकादायक ठरू शकते. शेताकडे जाणाऱ्या नागरिकांमध्ये तसेच रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

सौरऊर्जा प्रकल्प उभारूनही गावाला चोवीस तास वीज मिळत नसेल तर या प्रकल्पाचा उपयोग काय ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्याबाबत महावितरणने गांभीर्याने दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे. जेऊर पंचक्रोशीतील वीजपुरवठा सुरळीत करून रात्रीच्या वेळी वीज खंडित होऊ नये अशी मागणी बाळु शेटे, गणेश शेटे, नंदू तोडमल, सूरज तोडमल यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.

## द • ख • ल

### शेतजमिनीच्या बक्षीसपत्राच्या रागातून महिलेवर जीवघेणा हल्ला; बाप-लेकावर गुन्हा

**अहिल्यानगर :** वडिलांनी बक्षीसपत्र करून दिलेली शेतजमीन नावावर केल्याच्या रागातून एका महिलेवर कड्याने व लाथाबुक्क्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडगाव गुप्ता येथील अनिता सूर्यभान भांड (वय ४१) या मजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या वडिलांनी त्यांना शेतजमीन बक्षीसपत्र करून दिली होती. याच गोष्टीचा प्रचंड राग आरोपींच्या मनात होता. २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास अनिता भांड या वनराई कॉलनीजवळून जात असताना त्यांना रस्त्यात अडवण्यात आले. त्यानंतर आरोपी अनिकेत बाबासाहेब दातीर याने अनिता यांच्या डोक्यात व कपाळावर हातातील लोखंडी कड्याने जोरदार प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. यावेळी त्याचा वडील बाबासाहेब राधोजी दातीर (दोघे रा. एकरुख, शिर्डी, ता. राहाता) यानेही अनिता यांना बेदम लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दोघांनी मिळून त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची उघड धमकी दिली. हल्ल्यानंतर जखमी अनिता भांड यांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील वैद्यकीय जबाबावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात २ सप्टेंबर रोजी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेनुसार विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार साईनाथ टेमकर करत आहेत.

### हॉलचे बांधकाम पाडण्याची धमकी; पाच लाखांची खंडणी मागणाऱ्या नगरसेविका पुत्रासह दोघांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील मुकुंदनगर भागात सुरू असलेल्या कम्युनिटी सेंटरचे बांधकाम पाडण्याची धमकी देत पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बांधकाम व्यावसायिक नुरमोहम्मद आबेद शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून शहबाज जाफर खान उर्फ बाबा खान आणि शेख सादीक अल्लाबकश यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नुरमोहम्मद शेख यांचा सहारा सिटी परिसरात 'अल नूर कम्युनिटी सेंटर' नावाचा हॉल असून सध्या त्याचे बांधकाम सुरू आहे. मध्यरात्रीच्या सुमारास नगरसेविकेचा मुलगा शहबाज खान याने फिर्यादीला फोन करून दमदाटी केली. मी महापालिकेत तुझ्या बांधकामाविरुद्ध तक्रार केली आहे. तुला या भागात व्यवसाय करायचा असेल आणि हॉल सुरू ठेवायचा असेल, तर पाच लाख रुपये द्यावे लागतील. अन्यथा उपोषणाला बसून बांधकाम तोडायला लावेन, अशी धमकी त्याने दिली. त्यानंतर आरोपीने पैसे घेण्यासाठी शेख सादीक अल्लाबकश याला पाठवत असल्याचे सांगून तात्काळ पैशांची जुळवाजुळव करण्यास सांगितले. पैसे न दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकीही दिली गेली. या खंडणीमागे भैय्यासाहेब बॉक्सर उर्फ इस्माईल अशोक दरीयामी याचा हात असल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे. या प्रकरणी अहिल्यानगर पोलिसांनी आरोपींविरोधात खंडणी व धमकावल्याचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### मळगंगा प्रसादालयाच्या माध्यमातून वर्षभरात ७९ हजार लोकांना लाभ : रसाळ



**निघोज :** मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाच्या माध्यमातून वर्षभरात ७९ हजार ३६२ लोकांना लाभ झाला असून अध्यक्ष वसंत कवाद, पदाधिकारी, विश्वस्त मंडळ व सभासद तसेच मुंबईकर मंडळ व ग्रामस्थ तसेच भावीक देणगीदाते यांच्या माध्यमातून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचा कारभार लोकाभिमुख होत असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी व्यक्त केले आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाचा द्वितीय वर्धापन सत्यनारायण महापूजा तसेच येथील कर्मचाऱ्यांचा सत्कार करुण साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी सर्व विश्वस्त मंडळ तसेच सल्लागार, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अन्नदान देणगी १७ लाख २७ हजार ९४० , कुपन देणगी १५ लाख २६ हजार ४५६ एकूण जमा ३२ लाख ५४ हजार ३९६ तसेच एकूण खर्च २८ लाख २५ हजार ४१९ झाला असून ४ लाख २८ हजार ९७७ रुपये शिल्लक राहिले आहेत. अतिशय चांगला प्रतिसाद प्रसादालयाला मिळत आहे. संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांच्या प्रयत्नातून विविध योजना राबविण्यात येत असून ट्रस्टला देणगीदार, भावीक, ग्रामस्थ यांचे चांगले सहकार्य मिळत असल्याची माहिती कळसकर साहेब यांनी दिली आहे. यावेळी अमृता रसाळ, शांताराम कळसकर तसेच विश्वस्त व सल्लागार तसेच सभासद व ग्रामस्थ यांच्या हस्ते करण्यात आला.

### बोधेगावात बसच्या तिकिटावर प्रवाश्यांना २ ठिकाणी उतरून देण्याचे वरिष्ठांचे आदेश

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील गेवराई राज्यमार्गावर असणाऱ्या व पंचक्रोशीतील जवळपास ५० गावांचे केंद्र बिंदू समजल्या जाणाऱ्या बोधेगाव गावचा मार्गालगत मोठया प्रमाणात विस्तार झाला असून शेवगावहून एस टी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशाने बोधेगावंचे तिकीट घेऊन बोधेगावातीलच लाडजळगांव फाट्यावर



उतरायचे झाल्यास त्या प्रवाशास सध्या बोधेगावात असणाऱ्या बसस्थानकावरच वाहक सक्तीने उतरून देत असल्याने त्यातील उतरणारे अनेक वृद्ध, महिला व लहान मुले, विद्यार्थी तसेच काही अपंग प्रवासी लाडजळगाव फाट्याच्या जवळच वास्तव्यास असल्याने प्रवासामध्ये सोबत असलेल्या जड सामानासह नाविलाजाने पाई अंतर चालत यावे लागत होते. मात्र या प्रमुख मागणीसाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य रावसाहेब निकाळजे यांनी जिल्हा स्तरावरील एस टी महामंडळ विभागाचे विभाग नियंत्रक यांना समक्ष भेटून सविस्तर निवेदन देऊन त्यांचे लक्ष वेधले असता एस टी महामंडळाच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी सदर निवेदनाची तात्काळ दखल घेतली असून शेवगाव - गेवराई राज्यमार्गावर मार्गावर ये - जा करणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेसना बोधेगाव तिकिटावर सध्या असणाऱ्या बोधेगावातील बसस्थानकावर व लाडजळगाव फाट्यावर प्रवाशांच्या सोयीनुसार ( इच्छेनुसार) उतरून देण्याबाबतचे एस टी महामंडळाने वाहक व चालकांना आदेश दिले असल्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या असंख्य प्रवाश्यांना त्याचा मोठा फायदा होणार असल्याने असंख्य प्रवाशांनी एस टी महामंडळाने काढलेल्या या आदेशाचे अभिनंदन केले आहे.

## कामोठे नगरीत पारनेरकर रहिवासी संघाची पाच लाखांची दहीहंडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** अहिल्यानगर जिल्ह्यातील मुंबई स्थित रहिवासी असणाऱ्या पारनेर,जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने नवी मुंबईतील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारे पारनेरकर रहिवाशी संघाच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही ५,५५,५५५ रूपयांची दहीहंडी उत्सव सोहळा साजरा करण्यात येत आहे.हा सोहळा संत शिरोमणी तुकाराम महाराज मंदिर कामोठे सेक्टर- ... प्रांगणात मोठ्या भक्तिभावाने संपन्न होत आहे. या दहिहंडी उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन पारनेर तालुका रहिवासी संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

अस्मिता पुणेकर यांचा सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दहिहंडी सोहळ्याला तालुक्यातील सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच नवीमुंबई, पनवेल शहरातील सामाजिक धार्मिक अध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असणारे सर्व प्रमुख मान्यवर मंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती पारनेरकर रहिवाशी संघाच्या वतीने देण्यात आली.

मुंबई शहर आणि उपनगरातील बहुतांश गोविंदा पथक आपले चित्तथरारक कौशल्य दाखवून सलामी देण्यासाठी आणि दहीहंडी फोडण्याचा मान सन्मान मिळवण्यासाठी येत असतात. पारनेरकर रहिवासी संघाच्या वतीने आलेल्या प्रत्येक गोविंदा पथकाला बक्षीस आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले. दहीहंडी पुजन, करून सलामी पथकांच्या उपस्थितीत मनोरंजनाचा खास महीला माता- बहीणींसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा संगीत भजन स्पर्धा लहान थोरांपासुन सगळ्यांच्या कलागुणांना वाव देऊन सन्मानासाठी सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान सोहळा संपन्न होणार असल्याचे समितीच्या वतीने पारनेरकर रहिवाशी भाऊशेठ पावडे, कुंडलिक वाफारे, कृष्णा ढोमे, दिलिप घुले, संजय आहेर, मनोज कवडे, महादेव पुंडे, धनंजय निमसे, शुभम वाफारे जालिंदर खोसे, सबाजी जराड, गणेश गुंड, प्रशांत ठुबे, अमोल डोंगरे, अक्षय मगर, विलास लांडगे, तुषार लांडगे, डॉ.सिताराम गुंड , माऊली तांबोळी,अश्विन गायखे,बन्सी पागिरे एकनाथ लामखडे आदी मान्यवर तयारी करीत आहेत.

## शाळेसमोर विद्यार्थिनीशी आक्षेपार्ह वर्तन; तिसगावात तरुणाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** शाळा सुटल्यानंतर घरी जाणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीशी आक्षेपार्ह वर्तन केल्याच्या आरोपावरून तिसगाव येथील २० वर्षीय तरुणाविरुद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी संबंधित तरुणाला पकडून मारहाण केल्याचेही पोलिसांकडे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे तिसगाव परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांकडील फिर्यादीनुसार, दि. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास अल्पवयीन विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर घरी जात होती. वृद्धेश्वर हायस्कूलसमोर गणेश सचिन शिंदे (वय २०, रा. तिसगाव) हा तिच्यासमोर आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्याने विद्यार्थिनीसमोर लैंगिक स्वरूपाचे इशारे करून तिचा हात धरला आणि आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

विद्यार्थिनीने त्याला विरोध करत आपणास तो आवडत नसल्याचे सांगून तेथून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, संबंधित तरुण पुन्हा तिच्या जवळ आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यानंतर विद्यार्थिनीने परिसरातील नागरिकांना घडलेला प्रकार सांगितला. प्रकाराची माहिती मिळताच नागरिक घटनास्थळी जमा झाले आणि त्यांनी संबंधित तरुणाला पकडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, जमावाकडून संबंधित तरुणाला मारहाण करण्यात आली. त्याच्या वाहनाचेही नुकसान झाल्याचे पोलिसांकडे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत संबंधित जखमी तरुणाला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर अल्पवयीन विद्यार्थिनीच्या फिर्यादीवरून गणेश सचिन शिंदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक निवृत्ती रायभान आगारकर करीत आहेत.

या घटनेमुळे शाळा परिसरातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शाळा भरताना आणि सुटताना परिसरात पोलिसांची गस्त वाढविण्याची तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी पालकांकडून होण्याची शक्यता आहे. अशा घटनांमध्ये नागरिकांनी कायदा हातात न घेता तातडीने पोलिसांना माहिती देणे आवश्यक आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोप तपासाधीन असून तपासातून वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. न्यायालयीन निर्णय होईपर्यंत संबंधित व्यक्तीला दोषी मानता येणार नाही. अल्पवयीन पीडितेची ओळख कायद्यानुसार पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात आली आहे.

## अंतराळवीर व वैज्ञानिक घडण्याची प्रक्रिया शालेय जीवनापासून सुरु : तांदळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मुलांमध्ये अंतराळ आणि भूगोल शास्त्राविषयी जागृती निर्माण व्हावी, अवकाश संशोधन व चांद्रयान अभियानाची माहिती मिळावी तसेच या क्षेत्राची आवड निर्माण होऊन भविष्यातील अंतराळवीर आणि वैज्ञानिक घडण्याची प्रक्रिया सुरू व्हावी, या उद्देशाने पोलाद स्टील, जालना आणि आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा), अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'तारांगण आपल्या शाळेत' हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात



प्लॅनिटोरियम अर्थात तारांगण उभारून करण्यात आली.

याबाबत माहिती देताना एसा संस्थेचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांनी सांगितले की, पोलाद स्टीलच्या सहकार्याने हा उपक्रम वर्षभर अहिल्यानगरमधील विविध शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. मुलांना अवकाश संशोधन, चांद्रयान अभियान यासह अंतराळातील विविध घडामोडींची माहिती प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी आणि त्यांच्यामध्ये या विषयाविषयी कुतूहल निर्माण व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

पोलाद स्टील, जालना यांनी यासाठी नऊ-दहा व्हॅन तयार करून घेतल्या आहेत. या व्हॅनमध्ये तंबू तसेच तारांगणाशी संबंधित आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. या कृत्रिम तारांगणामध्ये एकावेळी विद्यार्थ्यांना सुमारे ३० ते ४० मिनिटे बसून कृत्रिम अवकाशात चांद्रयान मोहीम, सूर्यमाला, अवकाश संशोधन यासह विविध विषयांवरील व्हिडिओ पाहता येतात.

## गणेशोत्सवात महिलांची कुचंबणा टाळण्यासाठी अहिल्यानगरात फिरती स्वच्छतागृहे उभारा!

### गणेशोत्सवापूर्वी मनपाने ठोस नियोजन करावे : झिंजे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेशोत्सवाच्या काळात अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने महिलांसाठी पुरेशी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील प्रमुख गणेश मंडळांजवळ तसेच विसर्जनस्थळी महानगरपालिकेच्या वतीने फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अहिल्यानगर शहरात लवकरच सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून, शहरातील विविध गणेश मंडळांनी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील आकर्षक देखावे पाहण्यासाठी तसेच गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पाहण्यासाठी अहिल्यानगर शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक शहरात दाखल होतात. यामध्ये महिला व मुलींची संख्याही मोठी असते.



मात्र, शहरातील अनेक भागांत महिलांसाठी पुरेशा सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवाच्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने आतापासूनच आवश्यक नियोजन करावे, अशी मागणी झिंजे यांनी केली आहे.

अहिल्यानगर शहरातील बाजारपेठा, प्रमुख चौक आणि गर्दीच्या भागांमध्ये विविध कामांसाठी मोठ्या संख्येने महिला येत असतात. मात्र, सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असल्यामुळे महिलांना अनेकदा गैरसोयीचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवाच्या काळात शहरात नागरिकांची गर्दी अनेक पटींनी वाढते. त्यामुळे महिलांसाठी स्वच्छतागृहांचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहरात येणाऱ्या महिला तसेच विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहासारखी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांची कुचंबणा होणे ही गंभीर बाब आहे, असे झिंजे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## शेतकऱ्यांनी पारनेर मार्केट कमिटीत कांदा आणावा : बेलकर

### पारनेर बाजार समितीत कांद्याला चांगला भाव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी कांद्याला चांगला बाजारभाव मिळाला. कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात होत असतानाही बाजारभाव समाधानकारक असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आगामी काळात कांद्याचे बाजारभाव आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांनी सांगितले.

बाजार समितीच्या उपलब्ध माहितीनुसार, बुधवारच्या लिलावात २१ हजारांहून अधिक कांदा गोणींची आवक झाली असून एकूण आवक सुमारे ११ हजार ३३६ क्विंटल होती. कांद्याला साधारण १ हजार ते ५ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल असा बाजारभाव मिळाला. उत्कृष्ट दर्जाच्या कांद्याला ५ हजार १०० रुपयांपर्यंत भाव मिळाला, तर अपवादात्मक दर्जाच्या कांद्याला ५ हजार ४०० रुपयांपर्यंतचा उच्चांकी बाजारभाव मिळाल्याची बाजार समितीच्या पत्रकात नोंद आहे. कांद्याच्या प्रतवारीनुसारही चांगले दर मिळाले. नंबर १ कांद्याला ४ हजार ६०० ते ५ हजार १०० रुपये, नंबर २ कांद्याला ४ हजार ते ४ हजार ५०० रुपये, नंबर ३ कांद्याला ३ हजार ३०० ते ३ हजार ९०० रुपये, तर नंबर ४ कांद्याला १ हजार ते ३ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. गोल्टी कांद्याला ३ हजार ५०० ते ४ हजार ३०० रुपये असा बाजारभाव मिळाला. यावेळी बाजार समितीचे उपसभापती संदीप सालके, सचिव सुरेश आढाव तसेच संचालक मंडळाने शेतकऱ्यांना बाजार समितीच्या सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

सध्या कांद्याला चांगला बाजारभाव मिळत असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. आगामी काळात कांद्याचे बाजारभाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला कांदा पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणावा. असे आवाहन बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी बाजार समितीत कांदा विक्री करताना स्वतः उपस्थित राहावे तसेच लिलाव प्रक्रियेची माहिती घ्यावी, असे आवाहनही बाजार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री गणेशाला डीजेचा दणदणाट नको; समाजाला ज्ञानाचा प्रकाश हवा!

### रस्ते-पदपथ अडविणाऱ्या मंडपांनाही विरोध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेशभक्तीच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश डीजेचा दणदणाट, प्रचंड क्षमतेच्या ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर तसेच संस्कृतीच्या नावाखाली सार्वजनिक रस्ते व पदपथ अडविणाऱ्या मंडपांविरोधात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांनी जनआंदोलनाची घोषणा केली आहे. गणेशोत्सवाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी दिलेल्या लोकजागृती, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूळ उद्देशाकडे पुन्हा नेण्यासाठी या दोन्ही संघटना लवकरच 'लोकमान्य राष्ट्रीय गणेशोत्सव आचारसंहिता २०२६' जाहीर करणार आहेत.

या प्रस्तावित जनआचारसंहितेत गणेशोत्सवाच्या काळात डीजे, प्रचंड क्षमतेचे ध्वनिवर्धक तसेच वाहनांवर बसविलेल्या ध्वनिभिंतींना स्पष्टपणे नकार देण्यात येणार आहे. गणेशोत्सव हा भक्ती, सामाजिक प्रबोधन आणि लोकशिक्षणाचा उत्सव असावा; ध्वनीप्रदूषणाची स्पर्धा किंवा शक्तिप्रदर्शनाचे माध्यम होऊ नये, अशी भूमिका संघटनांनी मांडली आहे. सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक तसेच रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या मार्गांवर मंडप, कमानी, व्यासपीठे किंवा जनरेटर उभारण्यासही संघटनांकडून विरोध केला जाणार आहे. उत्सवासाठी जागेचा वापर करायचा असल्यास नागरिकांची वाहतूक, आपत्कालीन सेवा आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता यांना कोणत्याही परिस्थितीत बाधा येऊ नये, अशी मागणी करण्यात येणार आहे.

ध्वनियंत्रणे वापरणे अत्यावश्यक असल्यास त्यासाठी लेखी परवानगी, निर्धारित वेळ आणि कायद्याने निश्चित केलेल्या ध्वनिमर्यादांचे काटेकोर पालन बंधनकारक करण्यात यावे, अशी मागणीही आचारसंहितेत करण्यात येणार आहे. 'गणेशभक्ती म्हणजे नागरिकांचे कान फोडणे नव्हे आणि संस्कृती म्हणजे सार्वजनिक रस्त्यांवर मालकी हक्क सांगणे नव्हे,' अशी स्पष्ट भूमिका पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांनी घेतली आहे.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला केवळ धार्मिक उत्सवाचे स्वरूप न देता त्यामागे लोकजागृती, सामाजिक एकात्मता, राष्ट्रीय भावना आणि प्रबोधनाचा व्यापक विचार ठेवला होता. विविध जाती-धर्मांतील नागरिकांना एकत्र आणून समाजात जागृती निर्माण करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाचा उपयोग व्हावा, हा त्यामागील व्यापक दृष्टिकोन होता. मात्र, सध्याच्या काळात अनेक ठिकाणी गणेशोत्सवाचे स्वरूप बदलत असल्याची खंत संघटनांनी व्यक्त केली आहे. ध्वनिस्पर्धा, मोठ्या आवाजातील डीजे, शक्तिप्रदर्शन, राजकीय प्रसिद्धी, वाहतूक कोंडी आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण यामुळे उत्सवाच्या मूळ उद्देशालाच बाधा येत असल्याचा आरोप



करण्यात आला आहे. ही विकृती रोखून गणेशोत्सवात लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधानिक नैतिकता आणि कायद्याचे राज्य यांची पुनर्स्थापना करणे, हा प्रस्तावित आचारसंहितेचा मुख्य उद्देश राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

धर्मस्वातंत्र्य हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार असला तरी त्याच्या नावाखाली अनिच्छुक नागरिकांवर कर्णकर्कश आवाज लादता येणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. तसेच Union of India v. State of Gujarat, (२०११) १४ डउउ ६२ या निर्णयाचा संदर्भ देत सार्वजनिक रस्ते व सार्वजनिक जागांवर अनधिकृत धार्मिक बांधकामांना प्रतिबंध करण्याची जबाबदारी प्रशासनावर असल्याचे संघटनांनी नमूद केले आहे.

# झोपडीधारकांना घराचा हक्क

## पुनर्वसन प्रक्रियेत ५१ टक्के संमती महत्त्वाची

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील झोपडीधारकांना सुरक्षित व पक्के घर मिळावे यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विविध पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहेत. झोपडीधारकांनी पात्रता, विकसकाची जबाबदारी आणि पुनर्वसन प्रक्रियेची माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी किमान ५१ टक्के झोपडीधारकांची संमती महत्त्वाची असून, नोंदणीकृत विकसकाची निवड करून योजना राबविता येते. प्रस्तावाची विविध विभागांकडून छाननी झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाते.

प्राधिकरणाच्या उपलब्ध माहितीनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात आतापर्यंत २९५ पुनर्वसन योजना मंजूर झाल्या आहेत. यामध्ये १ लाख १३१ झोपडीधारकांचा समावेश आहे. त्यापैकी ७१ योजना पूर्ण झाल्या असून १२ हजार ५०५ झोपडीधारकांचे पुनर्वसन झाले आहे. १८० योजना कार्यान्वित आहेत.

**पाच वर्षे विकसकाची देखभाल :**
**बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्यापासून पाच वर्षे इमारतीची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी विकसकाची असते. त्यानंतर व्यवस्थापन सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे जाते. भविष्यातील देखभालीसाठी प्रत्येक सदनिकेमागे किमान ४० हजार रुपयांचा कॉर्पस फंड जमा करण्याची तरतूद आहे.**
**झोपडीधारकांनी पात्रतेचे पुरावे जतन करून अधिकृत प्रक्रियेत सहभागी व्हावे. अनधिकृत व्यक्तींच्या आश्वासनांवर विश्वास न ठेवता प्राधिकरणाशी संपर्क साधावा, असे आवाहन जनसंपर्क अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे डॉ. गणेश नानासाहेब देसाई यांनी केले आहे.**

### पात्रतेसाठी पुरावे आवश्यक

झोपडपट्टी क्षेत्र निश्चित झाल्यानंतर सर्वेक्षण करून झोपडीधारकांकडून वास्तव्याचे पुरावे घेतले जातात. त्यानंतर परिशिष्ट-२ मध्ये पात्रता निश्चित केली जाते. १ जानेवारी २००० किंवा त्यापूर्वीच्या वास्तव्याचा किमान एक पुरावा तसेच सध्याच्या वास्तव्याचा एक पुरावा आवश्यक आहे. मतदार यादी, वीज बिल, गणना फॉर्म, मालमत्ता कराचा पुरावा आणि इतर अधिकृत कागदपत्रे ग्राह्य धरली जातात.

१ जानेवारी २००० पूर्वीपासून वास्तव्य करणाऱ्या पात्र झोपडीधारकांना मालकी हक्काने मोफत पुनर्वसन सदनिका देण्याची तरतूद आहे. १ जानेवारी २०११ पूर्वी अस्तित्वात आलेल्या असंरक्षित झोपड्यांमधील पात्र झोपडीधारकांसाठी सशुल्क पुनर्वसनाची तरतूद असून सदनिकेसाठी २.५० लाख रुपये रक्कम निश्चित आहे.

पात्रतेबाबत आक्षेप असल्यास सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे अपील करता येते. त्यानंतर विभागीय आयुक्त, पुणे आणि शिखर तक्रार निवारण समितीकडे दाद मागता येते.

### संक्रमण निवासाची जबाबदारी विकसकाची

झोपड्या निष्कासित केल्यानंतर पुनर्वसन इमारत पूर्ण होईपर्यंत पात्र झोपडीधारकांच्या निवासाची व्यवस्था विकसकाने करणे आवश्यक आहे. संक्रमण शिबिरात विनामूल्य निवास किंवा नियमानुसार घरभाडे देण्याची तरतूद आहे.

पुनर्वसन सदनिकेचे चटईक्षेत्र बाल्कनीसह ३०० चौ. फूट असते. सदनिकेत हॉल, स्वयंपाकघर, बेडरूम, संडास व न्हाणीघर अशा सुविधा असतात. सदनिका पती-पत्नीच्या संयुक्त मालकीची राहते. ताबा मिळाल्यापासून पाच वर्षांपर्यंत सदनिका विक्री किंवा हस्तांतरित करता येत नाही.

---

## दखल

### एमपीएससी पेपरफुटीची एसआयटी चौकशी करा : डॉ. नीलम गोऱ्हे



**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटीची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना नेत्या तथा महाराष्ट्र विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली.

प्रकरणातील आरोपी व संशयितांचे कॉल रेकॉर्ड, व्हॉट्सॲप संवाद, आर्थिक व्यवहार, डिजिटल उपकरणे तपासावीत. प्रश्नपत्रिका कुठून बाहेर आली, किती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आणि इतर परीक्षांमध्येही गैरप्रकार झाले आहेत का, याचा शोध घ्यावा, असे त्यांनी सांगितले. या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेष ज्ञान आवश्यक असलेल्या पदांसाठी 'एनी डिग्री' धोरणाचा फेरविचार करून विषयसुसंगत शैक्षणिक पात्रता ठेवावी. तसेच विद्यार्थ्यांवरील परीक्षा शुल्काचा भार कमी करण्यासाठी स्मार्ट कार्ड किंवा एकत्रित प्रोफाइलची सुविधा द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.अष्टविनायक देवस्थानांचा विकास, एकवीरा देवी मंदिर रोपवे, शाळांमधील सुविधा आणि महिला अत्याचारांच्या घटनांबाबतही त्यांनी भूमिका मांडली. गणेशोत्सवातील डीजेच्या ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याची गरज व्यक्त करत विद्यानंद बापट यांना झालेल्या मारहाणीचा निषेध केला.गरजू मुलींना पोलीस भरतीची तयारी करता यावी यासाठी 'शौर्यकन्या' योजनेअंतर्गत मोफत ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येणार असून, १२ सप्टेंबरपासून प्रशिक्षण सुरू होणार असल्याची माहिती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

### मांदळेवाडीतील वीजपुरवठ्याचा लंपडाव, लोणीहून मागणी



लोणी धामणी : मांदळेवाडी (ता. आंबेगाव) परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. सततच्या वीज खंडित होण्यामुळे घरगुती कामांसह शेतीच्या कामांवरही मोठा परिणाम होत आहे.

मांदळेवाडी परिसरातील दहापोल येथून चोरीला गेलेल्या वीजतारांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने समस्या अधिक गंभीर झाली आहे. सध्या मांदळेवाडीला रांजणगाव (ता. शिरूर) येथून वीजपुरवठा केला जात आहे. मात्र, या मार्गावर वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.

मांदळेवाडीला लोणी (ता. आंबेगाव) येथून वीजपुरवठा जोडण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. लोणीहून वीजपुरवठा केल्यास वारंवार उद्भवणारी वीज समस्या कमी होण्यास मदत होईल, असा ग्रामस्थांचा विश्वास आहे.

महावितरणने दहापोल येथून चोरीला गेलेल्या वीजतारांचा शोध घेऊन वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवावी, तसेच लोणीहून वीजपुरवठा करण्याच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### ऑटोरिक्षा भाडेवाढ लागू; रात्री २५ टक्के अतिरिक्त भाडे

पुणे : प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मंजूर केलेली ऑटोरिक्षा भाडेवाढ १ सप्टेंबरपासून पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात लागू झाली आहे. सुधारित दरानुसार पहिल्या १.५ किलोमीटरसाठी ३० रुपये, तर त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २० रुपये भाडे आकारण्यात येणार आहे.पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात रात्री १२ ते सकाळी ५ या वेळेत २५ टक्के अतिरिक्त भाडे आकारण्यास परवानगी देण्यात आली आहे. ग्रामीण भागात रात्री ११ ते सकाळी ५ या कालावधीत ४० टक्के अतिरिक्त भाडे आकारता येणार आहे.पुणे व पिंपरी-चिंचवड कार्यक्षेत्रातील ऑटोरिक्षांमधून प्रवाशांसोबत नेण्यात येणाऱ्या ६० बाय ४० सेंटीमीटर किंवा त्यापेक्षा मोठ्या आकाराच्या नगासाठी तीन रुपये शुल्क आकारता येणार आहे.ऑटोरिक्षांचे मीटर कॅलिब्रेशन करण्यासाठी २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सुधारित भाड्यानुसार तात्पुरते टॅरिफ कार्ड उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याची वैधताही २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहणार आहे. त्यानंतर प्रवाशांकडून मीटरप्रमाणे भाडे घेणे बंधनकारक राहणार आहे.मीटर तपासणी व कॅलिब्रेशनसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या माध्यमातून अलंकार पोलिस ठाण्यासमोर, कर्वेनगर, ईऑन पार्कजवळील खराडी पोलिस चौकीसमोर आणि दिवे येथील चाचणी मैदानावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी माहिती दिली.

### दहीहंडी महोत्सवात पुणेकरांना 'दशावतार'ची मेजवानी

पुणे : दहीहंडी उत्सवाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व जपत आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्टच्या वतीने 'पुण्याच्या अभिम ानाची दहीहंडी, पुण्याची सोन्याची दहीहंडी' या संकल्पनेतून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त पुणेकरांना कोकणातील ८०० वर्षांची समृद्ध परंपरा असलेल्या 'संयुक्त दशावतार' नाट्यप्रयोगाचा अनुभव घेता येणार आहे, अशी माहिती पुणे दहीहंडी उत्सवाचे अध्यक्ष वैभव वाघ यांनी पत्रकार परिषदेत दिली.शुक्रवारी रात्री ८.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिरात 'संयुक्त दशावतार'चा प्रयोग होणार आहे. या कार्यक्रमाला गृहराज्यमंत्री योगेश कदम, पुणे महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शनिवारी महाराणा प्रताप बागेसमोरील मधुकर चिमणराव पोतनीस रस्ता येथे मुख्य दहीहंडी उत्सव होणार आहे. सकाळी ८ वाजता सामूहिक भगवद्गीता पठण, त्यानंतर विवेचनकार डॉ. संजय मालपाणी यांचे गीतेवरील विवेचन होईल. दुपारी १ ते ४ या वेळेत 'आपकी फर्माईश' कार्यक्रमात नागरिकांच्या आवडीची गाणी सादर केली जाणार आहेत.सायंकाळी ५ वाजता कोकणातील पारंपरिक 'ढाक्कू माकुम' अर्थात बाल्या नृत्य, तर ५.३० वाजता उत्तर महाराष्ट्र व खानदेशाची ओळख असलेले 'बारा पावली' अहिराणी लोकनृत्य सादर केले जाणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ नंतर मुख्य दहीहंडी फोडण्यात येणार आहे.

या सांस्कृतिक सोहळ्यात पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वैभव वाघ यांनी केले.

---

## खेड्यापाड्यातही मोठ्या गणेशमूर्तींची धूम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील शहरांसह ग्रामीण भागात गणेशमूर्ती तयार करण्याच्या काम ाला वेग आला असून, मूर्ती तयार करण्याची लगबग आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. कारागीर दिवस-रात्र मेहनत घेत असून, रंगकाम, सजावट, वस्त्रांची नक्षीकामे तसेच मूर्तीला आकर्षक रूप देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

गावडेवाडी येथील मूर्तिकार शीधर राजगुरू व प्रथमेश राजगुरू यांच्या कारखान्यात सुमारे तीन हजार गणेशमूर्ती तयार करण्यात आल्या आहेत. यातील बहुतांश मूर्ती ग्राहकांच्या मागणीनुसार आणि त्यांच्या पसंतीप्रमाणे साकारण्यात आल्या आहेत. गणेश मंडळांकडून यंदा १० ते २५ हजार रुपये किमतीच्या मोठ्या मूर्तींना विशेष मागणी असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले.



पीओपीच्या मूर्ती कमी वजनाच्या, आकर्षक आणि तुलनेने परवडणाऱ्या असल्याने त्यांना बाजारात मोठी मागणी आहे. त्याचबरोबर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकडे नागरिकांचा कल वाढत असल्याने शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या मूर्तींनाही चांगली मागणी असल्याचे दिसून येत आहे. अनेक गणेश मंडळे आणि नागरिकांनी यापूर्वीच मूर्तींचे आगाऊ बुकिंग केले असून, ग्राहकांच्या मागणीनुसार विविध आकार व स्वरूपातील मूर्ती तयार केल्या जात आहेत.कारखान्यांमध्ये सध्या मूर्तींचे रंगकाम अंतिम टप्प्यात असून, आकर्षक रंगसंगतीसह पारंपरिक व आधुनिक स्वरूपाच्या मूर्तींना ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. गणेशमूर्तींसोबत घरगुती गणेशमूर्तींनाही मोठी म ागणी असल्याचे मूर्तिकार प्रथमेश राजगुरू यांनी सांगितले.

दरम्यान, कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती आणि मजुरीत झालेली वाढ यामुळे मूर्तींच्या किमतीवर परिणाम झाला आहे. यंदा गणेशमूर्तींच्या विक्रीत सुमारे १५ ते २० टक्के वाढ होण्याची शक्यता असल्याचे मूर्तिकार शीधर राजगुरू यांनी सांगितले. दुसरीकडे, पीओपीच्या मूर्तींमुळे जलप्रदूषणाचा धोका असल्याने पर्यावरणप्रेमींकडून शाडूच्या मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे आवाहन केले जात आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात पीओपीसोबतच पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींचीही बाजारपेठेत चांगलीच धूम पाहायला मिळत आहे.

## दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना शैक्षणिक मदतीचे बळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पेरणे :** दिव्यांग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षणप्रवाह अखंडित राहावा, या उद्देशाने पंचायत समिती हवेलीच्या पेरणे केंद्रांतर्गत शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

युवांश गलांडे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्किटेक्ट व उद्योजक विशाल गलांडे व सामाजिक कार्यकर्त्या हर्षदाताई गलांडे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना सॅक, टिफिन बॉक्स व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद गरजू विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य व शिक्षण समितीचे सदस्य पै. किरण शेठ साकोरे म्हणाले, ही मदत विद्यार्थ्यांच्या भविष्यातील स्वप्नांना बळ देणारी असून, शिक्षणाचा प्रवाह टिकविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.माजी उपसभापती माऊली अण्णा वाळके यांनी, दिव्यांगत्व ही मर्यादा नसून योग्य संधी व प्रोत्साहन मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी मोठी भरारी घेऊ शकतो, असे सांगितले. विशाल गलांडे यांनी विद्यार्थ्यांना साहित्याबरोबरच आत्मविश्वास देणे हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. पंचायत समिती सदस्य राणीताई वाळके यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी व सन्मान मिळावा, अशी भावना व्यक्त केली.गटशिक्षणाधिकारी हेमंत कुमार खाडे यांनी पालक, शिक्षक व समाजाच्या सहकार्याने एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, असा विश्वास व्यक्त केला. केंद्रप्रमुख गणेशानंद दराडे यांनी समाजातील दानशूर व्यक्तींनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

---

## करंजे सोसायटीच्या चेअरमनपदी राहुल शेंडकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** करंजे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी राहुल शेंडकर यांची बुधवारी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

**संस्थे मार्फत अनेक योजना रबावणे व पीक प्रात्यक्षिक पाहणी व मार्गदर्शन शिबीरे**



**राबून शेतकऱ्यांना उत्पन्न वाढी च्या दृष्टीने काम करून तात्काळ सुविधा पुरवीने करिता तळागाळात जाऊन काम करण्याचा मानस असल्याचे नवनिर्वाचित चेअरमन यांनी बोलताना व्यक्त केले.**

**– राहुल शेंडकर**
**नवनिर्वाचित चेअरमन**

करंजे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना १९१८ मध्ये झाली असून, सोमेश्वर पंचक्रोशीतील अनेक गावे व शेतकरी या संस्थेशी दीर्घकाळ जोडलेले आहेत. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून संस्थेमार्फत शेतकऱ्यांना विविध योजनांतर्गत कर्जवाटप केले जाते. संस्थेने पीककर्ज सुमारे १ कोटी ९० लाख रुपये, मध्यम मुदतीचे कर्ज २ कोटी २५ लाख रुपये तसेच अन्य योजनांतर्गत कर्जवाटप केले आहे. संस्थेचे भागभांडवल सुमारे १ कोटी रुपये असून, व्यापारी गाळ्यांच्या भाड्यातूनही उत्पन्न मिळते. संस्थेची कर्जवसुली सुमारे ८० टक्के आहे.चेअरम नपदासाठी राहुल शेंडकर यांच्या नावाला सर्व संचालक व सभासदांनी एकमताने अनुमोदन दिले. यावेळी माजी चेअरमन निवृत्ती शेंडकर, अनिल गायकवाड, साहेबराव गायकवाड, माजी सरपंच वैभव गायकवाड, मावळते चेअरमन महेश शेंडकर, उपाध्यक्ष मच्छिंद्र शेंडकर, हनुमंत शेंडकर, नवनाथ शेडकर, ज्येष्ठ संचालक शशिभाऊ गायकवाड, शहाजी गायकवाड, विठ्ठल गायकवाड, तानाजी गायकवाड, रवींद्र गायकवाड, महिला संचालिका शकुंतला गायकवाड, कुसुम शेंडकर, सचिव दीपक शिर्के व सोमनाथ गायकवाड उपस्थित होते. युवा कार्यकर्ते हरिष गायकवाड, धीरज गायकवाड तसेच करंजेपूल तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मयूर शेंडकर यांचीही उपस्थिती होती. राहुल शेंडकर यांच्या बिनविरोध निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

मजकूर अधिक प्रवाही आणि संक्षिप्त करा
उपस्थितांची यादी कमी करून बातमी नेटक्या करा
प्रारंभी निवडणुकीची पार्श्वभूमी स्पष्ट करा

## ओतूर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी २५ गहाळ मोबाईल मालकांना परत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ओतूर :** ओतूर (ता. जुन्नर) पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणांहून गहाळ झालेले तब्बल २५ मोबाईल फोन तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून काढण्यात ओतूर पोलिसांना यश आले. या मोबाईलची एकूण किंमत सुमारे ६ लाख ५० हजार रुपये आहे.

ओतूर पोलीस ठाण्यात मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणांची गांभीर्याने दखल घेत तांत्रिक तपास सुरू केला. मोबाईलच्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी विविध जिल्ह्यांमध्ये शोध घेऊन सर्व २५ मोबाईल हस्तगत केले.



**ओतूर पोलिसांनी शोधून काढलेले गहाळ मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना सुपूर्द करताना उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व पोलीस पथक.**

२ सप्टेंबर रोजी जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या हस्ते हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलावून सुपूर्द करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत ओतूर पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, पुणे ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि जुन्नर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, पोलीस हवालदार बाळशिराम भवारी, पोलीस हवालदार धनंजय पालवे आणि पोलीस हवालदार आशिष जगताप यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## ११ लाख ५० हजारांचे दागिने मालकांच्या ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल चोरीच्या दोन गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांनी जप्त केलेले १४० ग्रॅम सोन्याचे व २०० ग्रॅम चांदीचे दागिने, असा एकूण ११ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकांच्या ताब्यात परत केला.शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६४९/२०२६ अन्वये दाखल गुन्ह्यात १२१ ग्रॅम सोन्याचे आणि २०० ग्रॅम चांदीचे दागिने, असा ९ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. हा मुद्देमाल फिर्यादी शशांक बापूसाहेब कळमकर यांच्या ताब्यात देण्यात आला. तसेच गुन्हा रजिस्टर क्रमांक ६०४/२०२६ अन्वये दाखल गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले १९ ग्रॅम वजनाचे, अंदाजे १ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र फिर्यादी पूजा गजानन बुऱ्हाडे यांच्या ताब्यात परत करण्यात आले.

## पशुधन चोरटे जेरबंद; ५.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** पशुधन चोरीच्या घटनांनी त्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणारी कारवाई शिरूर पोलिसांच्या डी.बी. पथकाने केली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून म्हशी-बैल चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत दोन म्हशी, दोन बैल आणि पिकअप वाहन असा सुमारे ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सरडवाडी गावच्या हद्दीत शेतातील मोकळ्या जागेत बांधलेल्या दोन म्हशी चोरीला गेल्याची तक्रार शिरूर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. तपासादरम्यान पोलिसांना रामनाथ सलीम भोसले (वय ३१, रा. पाण्याची टाकी, शिरूर) याच्याबाबत माहिती मिळाली. त्याला शिरूर बाजारपेठ परिसरातून ताब्यात घेत चौकशी केली असता, साथीदाराच्या मदतीने पशुधन चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

तपासात आणखी एक पशुधन चोरीचा गुन्हा उघडकीस आला. चोरीचे पशुधन जावेद बबन पठाण (वय ३७, रा. वाळकी, जि. अहिल्यानगर) याच्याकडे विकल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यालाही अटक करण्यात आली.

दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता ३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार अक्षय कदम करीत आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार सो, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले आणि पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाने ही कारवाई केली.



पशुधन चोरीप्रकरणी जप्त केलेल्या म्हशी, बैल व पिकअप वाहनासह शिरूर पोलिसांचे पथक.

# पाथर्डी पंचायत समितीतच भरली रुपनरवाडीची शाळा!

## शिक्षक बदलीच्या मागणीसाठी पालकांचा अनोखा बैठा सत्याग्रह

### शाळेला कुलूप, प्रशासनाकडून तीन-चार दिवसांत शिक्षक देण्याचे आश्वासन

**अक्षय वायकर । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी शहर :** शिक्षक बदलाच्या मागणीसाठी रुपनरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी बुधवारी थेट पंचायत समिती गाठत प्रशासनाचे लक्ष वेधले. आंदोलनाचे स्वरूप एवढे अनोखे होते की, पंचायत समितीच्या आवारातच विद्यार्थ्यांची शाळा भरविण्यात आली. पालकांनी विद्यार्थ्यांचा अभ्यास घेत प्रशासनासमोरच शैक्षणिक प्रश्नाची तीव्रता मांडली.

रुपनरवाडी जिल्हा परिषद शाळेत कार्यरत शिक्षक संजयकुमार बड़े यांच्याबाबत शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविले आहेत. संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांना प्रभावीपणे अध्यापन करण्यास सक्षम नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या संदर्भात २५ मे रोजी गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदन देण्यात आले होते. यापूर्वी संबंधित शिक्षकावर प्रशासनाकडून वेळोवेळी निलंबनाची कारवाई झाल्याचेही पालकांचे म्हणणे आहे. मात्र त्यानंतर पुन्हा त्यांची शाळेवर नियुक्ती होत असल्याने पालकांमध्ये नाराजी असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, संबंधित शिक्षक शाळेत रुजू झाल्याची माहिती मिळताच काही विद्यार्थी घाबरून घरी परतल्याचा दावा पालकांनी केला. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थ, महिला पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी शाळेत जाऊन दुपारी दोनच्या सुमारास शाळेला कुलूप ठोकले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी सक्षम शिक्षकाची तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली.

यानंतर पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांसह पंचायत समिती कार्यालय गाठले. तेथे बैठक सत्याग्रह सुरू करण्यात आला. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान किती गंभीर आहे, हे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी पालकांनी पंचायत समितीच्या आवारातच विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतला. त्यामुळे काही काळ पंचायत समितीचे कार्यालय परिसर अक्षरशः 'शाळेच्या वर्गा'चे रूप धारण करून गेला.

या आंदोलनात गणेश चितळकर, सुनील वाघमोडे, दादासाहेब रूपनर, ज्ञानेश्वर रूपनर, कालिदास रूपनर, गौरव रुपनर, सुरेश रूपनर, ठकाजी रूपनर, गोविंद वाघमोडे, एकनाथ चितळकर यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व ग्रामस्थ सहभागी झाले होते. यावेळी संबंधित शिक्षकाच्या कुटुंबीयांकडून गावातील पुरुषांविरोधात महिलांना पुढे करून खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला. या आरोपांची प्रशासनाने सखोल चौकशी करून सत्यता तपासावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. दरम्यान, पंचायत समिती प्रशासनाने आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. तसेच येत्या तीन ते चार दिवसांत रुपनरवाडी शाळेसाठी नवीन शिक्षकाची नियुक्ती करण्याचे आश्वासन देण्यात आले. प्रशासनाच्या आश्वासनानंतर दुपारी साडेचारच्या सुमारास पालकांनी आंदोलन मागे घेतले. आता प्रशासनाच्या आश्वासनाची अंमलबजावणी कधी होते आणि रुपनरवाडीच्या विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी सक्षम शिक्षक कधी मिळतो, याकडे पालकांसह ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

---

द•ख•ल



## टाकळी कडेवळीत श्रद्धा मेडिकलतर्फे विद्यार्थ्यांसाठी क्रीडा साहित्याचे वाटप

**श्रीगोंदा :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाबरोबरच खेळाचे महत्त्व ओळखून येथील श्रद्धा मेडिकलचे संचालक दीपक देशमुख यांनी आज शाळेतील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या क्रीडा साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फुटबॉल, रिंगा, चेसबोर्ड तसेच उड्या मारण्याच्या दोऱ्या आदी क्रीडा साहित्य देण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्तीसह मानसिक विकास, एकाग्रता आणि खेळाविषयीची आवड वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात विद्यार्थ्यांना मैदानी खेळांकडे वळविण्याची गरज निर्माण झाली असताना दीपक देशमुख यांनी केलेला हा उपक्रम विशेष महत्त्वाचा ठरत आहे. सुदृढ शरीरातच सुदृढ मन वसते या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देत त्यांनी विद्यार्थ्यांसाठी केलेले हे योगदान कौतुकास्पद ठरले आहे.या उपक्रमाबद्दल शाळेच्यावतीने दीपक देशमुख यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि खेळाबद्दल निर्माण झालेला उत्साह हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.विद्यार्थ्यांच्या हातात क्रीडा साहित्य देऊन त्यांच्या भविष्यातील आरोग्यपूर्ण आणि सक्षम पिढीच्या निर्मितीस हातभार लावणारा श्रद्धा मेडिकलचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे.

## मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त अळकुटी महाविद्यालयात क्रीडा दिन साजरा



**निघोज :** भारतीय क्रीडाक्षेत्राला जागतिक पातळीवर गौरव मिळवून देणारे हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे होत्या. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभागप्रमुख प्रा. राजाराम गोरडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन.प्रा.अमोल नालकर व आभार प्रा.संदिप गेटम यांनी मानले. यावेळी प्रा. अर्जुन चाटे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा.प्रियंका दिवटे, प्रा. संजय जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. विनायक सोनवणे,प्रा.पोपट सुंबरे प्रा.मच्छिंद्र बेलोटे, डॉ. शांता थोरात, प्रा.सचिन बलसाने, प्रा.सुषमा करकंडे, प्रा.ऋषिकेश गीते, प्रा.अनुराधा गाढवे, प्रा. सुनीता भालेराव,श्री गोरख घोलप, श्री.नितीन घोलप, श्री.विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कानिंगध्वज,पांडुरंग शिरोळे, यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## बालमटाकळीत वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उद्घाटन



**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आली. वंचितचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा प्रदेश महासचिव प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बालमटाकळी गावातील सर्व समाजातील तरुण मोठ्या संख्येने एकत्र आले होते. वाजत-गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर शाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. शेवगाव - गेवराई राज्यमार्गावर असणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित सभेला ग्रामस्थ तसेच परिसरातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संतोष घोरपडे, सूर्यकांत भोंगळे, कल्याणराव भागवत, प्यारेलाल शेख, शाहुराव खंडागळे, अरुण झांबरे, योगेश साठे, प्रा. किसन चव्हाण, अशोक वाघुंबरे होते. यावेळी वंचित बहुजन आघाडी बालमटाकळी शाखेच्या अध्यक्षपदी दारासिंग भोंगळे यांची निवड करण्यात आली. संजय मिसाळ, महासचिव संतोष घोरपडे, कार्याध्यक्ष सूर्यकांत भोंगळे, सहसचिव सागर पटवेकर, खजिनदार ज्ञानेश्वर मिसाळ, सल्लागार अक्षय भोंगळे, गणेश मोरे, गटप्रमुख संदेश खंडागळे, कार्याध्यक्ष भाऊसाहेब भोंगळे, संघटक संतोष भोंगळे, प्रशांत साळवे आणि व्यवस्थापक अक्षय कवडे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमास बंडू शिंदे, ऑगस्टिन गजभिव, रवींद्र नीळ, बन्नूभाई शेख, धोंडीराम मासाळकर, विष्णू वीर, लुकस गजभिव, प्रमोद गजभिव, लक्ष्मण मोरे, सलीम जिलानी, रज्जाक सय्यद, अरुण नीळ, गहिनीनाथ बोरुडे, निवृत्ती नीळ, गोरख बोरुडे, सुदाम पौळ, संदीप पौळ तसेच भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष सुरेश घोक्षे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ड्रायव्हर सेवा ट्रस्टच्या प्रदेश उपाध्यक्षपदी गोरक्षनाथ कराळे

**नगर तालुका :** वाहन चालविताना येणाऱ्या अडचणी, चालकांच्या हक्कांचे प्रश्न आणि अपघातग्रस्तांना तातडीची मदत यासाठी सातत्याने पुढाकार घेणारे गोरक्षनाथ कराळे यांची ड्रायव्हर सेवा ट्रस्टच्या (इंडिया) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत झालेल्या या



निवडीमुळे वाहनचालक वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. पोखर्डी परिसरातील कराळे यांनी वाहनचालकांच्या प्रश्नांपासून आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात केली. वाहन चालक-मालक संघटनेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर त्यांनी चालकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविला. चालकांच्या हक्कांसाठी मोर्चे, आंदोलने तसेच उपोषणाच्या माध्यमातून त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.अपघातग्रस्तांच्या मदतीला धावून जाणे हेच सामाजिक कर्तव्य अशी भूमिका ठेवत कराळे यांनी अनेक गरजू वाहनचालकांना मदतीचा हात दिला आहे. अपघातानंतर जखमींना वेळेत रुग्णालयात दाखल करून उपचार मिळवून देण्यापासून ते चालकांच्या विविध अडचणी सोडविण्यापर्यंत त्यांचा सातत्याने पुढाकार राहिला आहे.

---

# बोधेगावसह २० गावांचा ताजनापूर टप्पा क्र.३मध्ये समावेश करण्यासाठी जनआंदोलन

## मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांनाही भेटणार

**रावसाहेब निकाळजे । राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव, बालमटाकळीसह २० पाणीटंचाईग्रस्त गावांचा ताजनापूर टप्पा क्रमांक ३ सिंचन योजनेत समावेश करावा, या मागणीसाठी लवकरच मोठे जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामनाथ राजपुरे यांनी दिली. शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या बाबत अधिक माहिती देताना राजपुरे म्हणाले की, शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावे गेल्या अनेक वर्षांपासून दुष्काळ आणि शेतीच्या पाणीटंचाईच्या संकटाचा मोठा सामना करत असून या भागातील शेतीचे संपूर्ण क्षेत्र सुरुवातीपासून पावसावर अवलंबून असून, पावसाचे अनियमित व अपुरे प्रमाण यामुळे शेतकऱ्यांना दरवर्षी आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. चालू खरीप हंगामातही समाधानकारक पाऊस न झाल्याने मूग, उडीद, तूर, सोयाबीन, बाजरी, कापूस, ऊस आदी पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून काही भागात पावसाअभावी पिके नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. तसेच भूजलपातळीत वाढ होऊन परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्याही मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असे राजपुरे यांनी स्पष्ट केले. चौकट :-लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन सर्व पक्षीय लढा उभारून शासनाकडे पाठपुरावा....!

ताजनापूर टप्पा क्रमांक ३ मध्ये बालमटाकळी, बोधेगाव, ठाकूर पिंपळगाव, बाडगव्हाण, लाडजळगाव, सुकळी, शेकटे बुद्रुक, शेकटे खुर्द, मुरमी, गायकवाड जळगाव, नागलवाडी, शिंगोरी, गोळेगाव आधोडी, दिवटे, राणेगाव, सोनविहीर, चेडेचांदगाव, सुळेपिंपळगाव, लखमापुरी, बेलगाव, अंतरवाली खुर्द व अंतरवाली बुद्रुक या पाणीटंचाईग्रस्त गावांचा समावेश करण्यासाठी आमदार मोनिकाताई राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील तसेच केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ड. प्रतापराव ढाकणे यांना सोबत घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेण्यात येणार आहे. गावांचा योजनेत समावेश होईपर्यंत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून गरज पडल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही रामनाथ राजपुरे यांनी यावेळी दिला.

---

# न्यायालयाच्या आदेशानंतरही कारवाई झाली का?

## बेकायदेशीर अटके'प्रकरणी तत्कालीन पोलीस निरीक्षकांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** न्यायालयाने गंभीर ताशेरे ओढून संबंधित तपास अधिकाऱ्यावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतरही प्रत्यक्षात कोणती कारवाई झाली, असा थेट सवाल आता उपस्थित झाला आहे. बेलवंडी पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्यात कोणत्याही ठोस पुराव्याविना शासकीय वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याला अटक केल्याच्या प्रकरणात तत्कालीन तपास अधिकारी तथा पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यावर झालेल्या कारवाईची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी काँग्रेस कमिटीचे श्रीगोंदा शहराध्यक्ष ड. समित सयाजी बोरुडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे गृहमंत्री, मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, संबंधित वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यासह अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन पाठवले आहे. न्यायालयाच्या निर्देशानंतरही कारवाई झाली नसेल, तर संबंधित यंत्रणांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**काय आहे प्रकरण?**

बेलवंडी पोलीस ठाण्यातील गुन्हा रजिस्टर क्रमांक ख-१४२/२०१६ प्रकरणात शासकीय रुग्णालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल हरिदास केवारे यांना तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी २३ मे २०२३ रोजी अटक केली होती.

या अटकेविरोधात डॉ. केवारे यांनी श्रीगोंदा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात फौजदारी जामीन अर्ज क्रमांक ४२७/२०२३ दाखल केला होता.

न्यायालयाचे गंभीर निरीक्षण; पोलिसांच्या कारभारावर ताशेरे

सदर जामीन अर्जावर ४ जुलै २०२३ रोजी निकाल देताना अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एस. शेख यांनी तपास अधिकारी आणि पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर निरीक्षणे नोंदवली होती.

आरोपीविरुद्ध कोणताही ठोस पुरावा नसताना आणि तो तपासात सहकार्य करत असतानाही सीआरपीसी कलम ४१(ए) तसेच सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले नसल्याचे न्यायालयाने नमूद केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, जामीन अर्जावर उत्तर देताना तपास अधिकाऱ्यानेच आरोपीविरुद्ध पुरावा आढळला नसल्याचे सांगून जामिनाला हरकत नसल्याची भूमिका घेतल्याचेही या प्रकरणात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पुरावा नाही, तरी अटक का? हा प्रश्न या प्रकरणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

**'न्यायालयाच्या आदेशाचे पुढे काय झाले?'**

न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरही प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी झाली की नाही, याची माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे, असे ड. समित सयाजी बोरुडे यांनी निवेदनात म्हटले आहे.या प्रकरणातील कारवाईचा अहवाल, विभागीय चौकशीची माहिती आणि संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे दाद; आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा

संबंधित प्रकरणात तातडीने कारवाईची माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्यास महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा ॲड. बोरुडे यांनी दिला आहे.

---

## डिंबे-माणिकडोह बोगद्याला मंजुरी

### पाचपुते पिता-पुत्रांचा श्रीगोंदेकरांकडून सत्कार




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील शेतीच्या सिंचन प्रश्नाशी निगडित असलेल्या बहुप्रतिक्षित डिंबे-माणिकडोह बोगदा प्रकल्पाला राज्य सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर श्रीगोंदा शहरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल बबनराव पाचपुते व आ. विक्रम पाचपुते यांचा श्रीगोंदेकरांच्यावतीने शनि चौकात सत्कार करण्यात आला. शेतकरी बांधवांची अनेक वर्षांची महत्त्वाची मागणी मंजूर झाल्याने तालुक्यातील शेतीच्या भविष्यासंदर्भात नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. बोगदा प्रकल्पामुळे सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार असून, अनेक गावांतील शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या दृष्टीने आता केवळ मंजुरीपुरते समाधान न मानता प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात होणे आवश्यक आहे. आता मंजुरीचे रूपांतर प्रत्यक्ष पाण्यात कधी होते, याकडे शेतकरी बांधवांचे लक्ष लागले आहे.

---

# जुन्या पेन्शनसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा एल्गार

## काळ्या फिती लावून आंदोलनाला सुरुवात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. मंगळवारपासून (दि.१) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यास सुरुवात केली आहे.

दि.१ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन करण्यात येत आहे.

यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाने मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्यात येईल तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे आणि राज्य समन्वयक सुनील भोर यांनी ही माहिती दिली.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही विविध आंदोलने, निवेदने आणि मोर्चांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वारंवार आंदोलने करूनही शासनाकडून या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही असा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे. त्यामुळे आता आंदोलनाचा टप्पा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील या आंदोलनासाठी महेंद्र हिंगे, सुनील भोर, देविदास खेडकर, दिलीप डोंगरे, संजय वाळे, संजय इघे, राज जाधव, सुनील दानवे, संजय भुसारी, राजू पठाण, जाकीर सय्यद, मुकुंद अंचवले, छबुराव फुंदे, बद्रीनाथ शिंदे, सुदाम दळवी, बाबासाहेब शिंदे, भाऊसाहेब शिंदे, अजित वडवकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. या आंदोलनाला विविध शिक्षक संघटनांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. मुख्याध्यापक संघाचे सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे बाबासाहेब बोडखे तसेच शिक्षक भारतीचे आप्पासाहेब जगताप यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

---

# शॉर्टसर्किटमुळे उसाच्या शेताला आग

## महावितरणच्या पंचनाम्यानंतर नुकसान भरपाईसाठी अहवाल पाठविणार : पगारे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगांव :** शेवगाव नगर परिषद हद्दीतील लांडे वस्ती येथे ३३ केव्ही वीज वाहिनीवर शॉर्टसर्किट झाल्याने बुधवार दि ०२ उसाच्या शेताला भीषण आग लागली. या आगीत शेतकरी मिराबाई भरतसिंग परदेशी यांचा सुमारे एक एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला. परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत ट्रॅक्टरच्या सहाय्याने आग आटोक्यात आणल्याने मोठे नुकसान टळले.

लांडे वस्ती परिसरातील गट क्रमांक ११८२ मधून मिराबाई भरतसिंग परदेशी यांच्या उसाच्या शेतातून ३३ केव्हीची वीजवाहिनी गेली आहे. बुधवारी दुपारी सुमारे सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास वीजवाहिनीवर पक्षी बसल्याने शॉर्टसर्किट झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. शॉर्टसर्किटनंतर पडलेल्या आगीच्या गोळ्यामुळे उसाच्या पिकाने पेट घेतला.



आगीची माहिती मिळताच परिसरातील गणेश लांडे, बलवीर परदेशी, आदित्य लांडे, सोमनाथ आठरे, अजित लांडे, विश्वजीत परदेशी, चंद्रकांत परदेशी व गोविंद लांडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करत ट्रॅक्टरच्या सहाय्याने उसाचे पीक वेगळे करून आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र, तोपर्यंत सुमारे एक एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला.

लांडे वस्ती परिसरातील शेतांमधून ३३ केव्हीची वीजवाहिनी, जुनी वीज लाईन तसेच विविध सबस्टेशनकडे जाणाऱ्या अन्य वीजवाहिन्या गेल्या आहेत. या परिसरात वारंवार शॉर्टसर्किटच्या घटना घडत असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी व रहिवाशांनी केला आहे. संबंधित वीजवाहिन्यांची तातडीने तपासणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच महावितरणचे सहाय्यक अभियंता भाऊसाहेब पगारे यांच्यासह अरुण भोसले, किरण चेडे व अमोल कदम यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

या घटनेबाबत बोलताना सहाय्यक अभियंता भाऊसाहेब पगारे यांनी सांगितले की, नुकसानीचा तलाठ्याकडून पंचनामा करण्यात येणार असून त्याचा अहवाल वीज महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला जाईल. त्यानंतर नियमानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दरम्यान, या आगीत उसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने बाधित शेतकऱ्याला तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.०४ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८




# जायकवाडीच्या पाण्यासाठी पूर्व भागातील ३२ गावांचा एल्गार

## सर्वपक्षीय एकजुटीचा निर्धार; हक्काचे पाणी मिळेपर्यंत संघर्ष सुरू



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : जायकवाडी जलाशयातून शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ३२ गावांना हक्काचे पाणी मिळावे, तसेच या भागातील तलाव, बंधारे, नालाबंडिंग व पाणलोट क्षेत्र पाण्याने भरून मिळावे, यासाठी पूर्व भागातील शेतकरी, युवक, महिला व ग्रामस्थांनी सर्वपक्षीय एकजुटीचा निर्धार केला आहे.

बोधेगाव येथे बुधवारी (दि.३) आयोजित बैठकीत हक्काच्या पाण्यासाठी निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला. सर्वपक्षीय पाणी परिषद कृती समितीचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव काकडे म्हणाले, पक्षीय जोडे बाजूला ठेवून पाण्याच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकत्र यावे. पाणी हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा विषय नसून तो आपल्या हक्काचा आहे.

संघर्ष केल्याशिवाय पाणी मिळणार नाही. ताजनापूर लिफ्ट योजनेच्या टप्पा क्र. १ व २ साठी आपण सातत्याने पाठपुरावा केला असून दुष्काळी भागातील शेतीला पाणी मिळेपर्यंत संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रश्नासाठी गावागावांत बैठका घेऊन जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रशासनाची अनास्था, राजकीय विरोध व अन्य अडचणींचा सामना करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने समिती स्थापन करून आंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार आहे. माजी जि.प. सदस्या हर्षदा काकडे यांनी महिलांनी व युवकांनी या लढ्यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. ताजनापूर टप्पा क्र. २ योजना महिलांच्या सहभागामुळे मंजूर झाली असून यापुढेही संघटित लढा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस जगन्नाथ गावडे, रामनाथ घोरतळे, राम अंधारे, विश्वनाथ कुढेकर, भाऊसाहेब घोरतळे, भास्कर मासाळ, माणिक गर्जे यांच्यासह शेतकरी, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन हरी फाटे यांनी केले. प्रास्ताविक अंबर बर्डे यांनी, तर आभार माणिक गर्जे यांनी मानले.

**३२ गावांचा सहभाग**

हातगाव, कांबी, बोधेगाव, बालमटाकळी, गायकवाड जळगाव, सुकळी, शेकटे बु., शेकटे खु., बाडगव्हाण, मुरमी, शोभानगर, गोळेगाव, लमानतांडा, नागलवाडी, खडके, मडके, लाडजळगाव, सोनविहीर, ठाकूर पिंपळगाव, चेडे चांदगाव, बेलगाव, सुळे पिंपळगाव, पिंगेवाडी, अंतरवाली खु., कोनोशी, आधोडी, दिवटे, शिंगोरी, राणेगाव, मुंगी, खामपिंपरी व लखमापुरी.

**काकडे साहेबांच्या पाठीशी उभे राहू**

पूर्व भागातील दुष्काळी ३२ गावांच्या पाण्यासाठी आजवर सत्ता भोगलेल्या पुढाऱ्यांनी एक शब्दही काढला नाही. त्यामुळे हक्काच्या पाण्यासाठी ड. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली युवक, शेतकरी व महिला एकजुटीने उभे राहतील.

**माणिक गर्जे, ग्रामपंचायत सदस्य, बोधेगाव**

# केडगावमध्ये पोलिसांचा छापा; १ लाख ८२ हजारांचा गांजा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : केडगाव परिसरातील वैष्णव नगर येथील तिरंगा चौकात घराच्या शेजारील कंपाउंडमध्ये बेकायदेशीरपणे गांजाची लागवड करणाऱ्या व्यक्तीवर कोतवाली पोलिसांनी कारवाई केली. विकास बाळू उमाप (रा. वैष्णव नगर, केडगाव) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून तब्बल १८ किलो २५० ग्रॅम वजनाची, १ लाख ८२ हजार ५०० रुपये किमतीची ओल्या गांजाची झाडे जप्त करण्यात आली. विकास उमाप हा घरालगतच्या कंपाउंडमध्ये विनापरवाना गांजाची लागवड करून त्याची निर्मिती व विक्री करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह पंचांच्या उपस्थितीत छापा टाकला. यावेळी पत्र्याच्या शेडजवळ हिरवीगार गांजाची झाडे आढळून आली. मंडल कृषी अधिकाऱ्यांनी झाडे गांजाची असल्याचे निश्चित केल्यानंतर ती मुळासकट उपटून जप्त करण्यात आली. वजन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाडांचे वजन करण्यात आले. याप्रकरणी उमाप याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार कलम ८(ब), २० अन्वये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करीत आहेत.

# बाराबाभळी शिवारात बनावट विदेशी दारू जप्त : एकास पकडले दुसरा फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भिंगार जवळील बारा बाभळी येथील महेश नगर भागात बनावट विदेशी दारूचा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला. यावेळी १ लाख ८५ हजार चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी विजय बलेश्वरसिंह कौशिक (रा. विजयनगर, भिंगार ) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून दुसरा आरोपी फरार आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी, पोलीस अधीक्षक मुंम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भुये, पोलिस अंमलदार संदीप पवार, संतोष खैरे, अमृत आढाव, बाळासाहेब खेडकर, सुनिता पवार यांचे एक पथक अवैध धंद्याविषयी शोध घेत असताना त्यांना भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत महेश नगर भागातील बाराबाभळी येथे एका इसमाने बनावट लेबल लावलेली दारू साठवून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली.

त्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी विजय कौशिक याला ताब्यात घेण्यात आले. त्याने ते घर भाड्याने घेतल्याचे सांगितले. यावेळी घराची जप्ती घेतली असता तेथे विदेशी दारू मिळून आली. या बॉटलवर लेबल, किंमत ,बॅच नंबर व उत्पादन तारीख दिलेली नव्हती. दारूच्या बॉटलवर बनावट लेबल लावल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी कौशिकी याला ताब्यात घेतले असून त्याच्या ताब्यातून १ लाख ७५ हजार रुपयांच्या दारूच्या बॉटल आणि २० हजार रुपयांचा एक मोबाईल असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने सदरचा माळ त्याचा साथीदार संदीप सानप (रा. मेहेकरी, तालुका नगर ) यांच्याकडून घेतल्याची माहिती दिली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बिबट्याची मोटरसायकल स्वारावर झडप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**माळवाडगांव** : गोदाकाठच्या खानापूर शिवारात भामाठाण शिव रस्त्यावर आज गुरुवार दि.३ रोजी रात्री ९ वाजता मोटारसायकलवर झडप घालून बापूसाहेब रायभान जगताप ( वय ३५) या खानापूर येथील तरुण शेतकऱ्यास जखमी केले. या तरूणाची बिबट्यासोबत झटापट सुरू असताना,बरोबर असलेल्या रिकाम्या किटल्याचे बचावासाठी हत्यार म्हणून उपयोग झाल्याने बिबट्याने धुम ठोकली.मात्र या झटापटीत जगताप यांचे पायाचे पोटऱ्यावर व हातावर पंजे व दात मारल्याने ते जबर जखमी झाले असून. आजूबाजूच्या वस्त्यावरील शेजाऱ्यांनी त्यांना तातडीने माळवाडगांव येथील रूग्णालयात उपचारासाठी आणले.मात्र पुढील उपचारासाठी त्यांना साखर कामगार रूग्णालयात दाखल करण्यात आले असता.तिथूनही ग्रामिण रूग्णालयात पाठविण्यात आले असून,ग्रामिण रूग्णालया मार्फत अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात येणार असल्याचे रात्री उशीराने १०.४५ वाजता समजले. खानापूर व लगतच्या भामाठान महाकंळवाडगांव शिवारातील शेतकऱ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन खानापूर ग्रामस्थांनी रात्री ग्रुप वर मेसेज टाकले आहेत.

# शिंगवे तुकाईचा पाणी प्रश्न तातडीने सोडवू

## आ. लंघे यांच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे उपोषण मागे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : वांबोरी चारी टप्पा २ मधून गावासाठी पाणी मिळावे या प्रमुख मागणीसाठी शिंगवे तुकाई येथील शेतकरी बांधवांनी अहिल्यानगर येथे सुरू केलेले उपोषण अखेर मागे घेण्यात आले आहे. आ. विठ्ठल लंघे यांच्या सकारात्मक मध्यस्थीने हा प्रश्न मार्गी लागला आहे. शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता.

वांबोरी चारी टप्पा २ मधून गावाला पाणी मिळावे, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचे हत्यार उपसले होते. या उपोषणाची माहिती मिळताच आ. विठ्ठल लंघे यांनी तातडीने उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या अडचणी आणि मागण्या समजून घेतल्या. शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी आपण सकारात्मक चर्चा करून ठोस पाठपुरावा करू, असे आश्वासन आ. लंघे यांनी यावेळी दिले. त्यांच्या या आश्वासनानंतर आणि झालेल्या यशस्वी चर्चेनंतर शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त करत आपले उपोषण मागे घेतले.



यावेळी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा यांच्यासह समस्त ग्रामस्थ व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. लंघे यांच्या या तत्पर भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दुचाकी अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : अकोले तालुक्यातील राजुर येथील स्मशानभूमी परिसरातील साडेसात वाजता झालेल्या भीषण अपघातात स्कुटीवरील तरुणी आणि केटीएम मोटरसायकलवर यांची समोरासमोर धडक झाल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. यात काजल संजय शुक्ला (वय वर्ष २४, रा. राजूर, ता. अकोले ) आणि रंधा (भोईरवाडी )येथील अक्षय तुकाराम भोईर( वय वर्ष २५ ) अशी मृतांची नावे आहेत.

या अपघातात मोटार सायकल वरील शंकर पोपट खाडे (वय २६,रा. रंधा, भोईरवाडी ता. अकोले) हा गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार काजल शुक्ला ही स्कुटी वरून राजूर येथून अकोले रोडने प्रवास करत होती. राजूर येथील स्मशान भूमीच्या पुढील भागात समोरून भरधाव वेगाने राजूर कडे आलेल्या केटीएम मोटरसायकलची तिच्या स्कुटीला जोरदार धडक बसली. यात स्कुटी व मोटार सायकल वरील तिघेही गंभीर जखमी झाले. दुचाकी वाहनांची मोठे नुकसान झाले. अपघात इतका भीषण होती की,काजल शुक्ला आणि अक्षय भोईर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर मोटार सायकल वरील अक्षय तुकाराम भोईर हा मोटार सायकल चालक गंभीर जखमी झाला.

त्याला प्रथम राजूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला नाशिक येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. या अपघातातील काजल शुक्ला यांच्या कुटुंबियांनी अवघ्या दोन दिवसांपूर्वी तिच्यासाठी नवीन स्कुटी घेतली होती. नवीन गाडी घेतल्याचा आनंद दोन दिवस ही टिकु शकला नाही आणि नियतीने शुक्ला कुटुंबावर काळाचा घाला घातला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चालू आहे.

# घरासमोर लावलेल्या मोटर सायकलची चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

कोल्हार : घरासमोर लावलेल्या पल्सर व शाईन या दोन मोटर सायकल अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास चोरून नेल्याची घटना बाभळेश्वर येथील वासुदेव नगर मध्ये घडली. याबाबत सविस्तर असे की चिमाजी भिमाजी गुंजाळ यांनी बजाज पल्सर गाडी नंबर एम एस १७ डीबी ७२ ८० आपल्या घरासमोर रात्रीच्यावेळी लॉक करून लावली होती. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चिमाजी गुंजाळ यांच्या घराचा दरवाजा बाहेरून लावून घेत गाडीचे लॉक तोडून पल्सर मोटरसायकल चोरून नेली. याच परिसरात दीड महिन्यापूर्वी अनिल वाणी यांची रॉयल एनफिल गाडी नंबर एम एच १७ सी झेड ९०२० क्रमांकाची बुलेट देखील चोरट्यांनी चोरून नेली होती. वासुदेव नगर मध्ये गेली दीड-दोन महिन्यापासून या मोटरसायकल चोरीचे सत्र सुरूच असल्याचे चिमाजी गुंजाळ यांनी सांगितले याबाबतची माजी गुंजाळ यांनी लोणी पोलीस स्टेशन येथे चोरीची फिर्याद दाखल केली आहे.

# एमआयडीसी परिसरात कुंटणखाण्यावर छापा : तीन महिलांची सुटका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

अहिल्यानगर : एमआयडीसी परिसरात गजानन कॉलनी येथे एका घरात सुरू असलेल्या कुंटण खाण्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने छापा टाकून तीन महिलांची सुटका केली. कुंटणखाना चालवणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली. या महिलेविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्राकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार करून एमआयडीसी परिसरात अवैध व्यवसायाचा शोध घेत असताना गजानन कॉलनी येथे एका घरात महिलेकरवी कुंटणखाना (वेश्याव्यवसाय) चालवला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचा समक्ष खात्री करण्यासाठी एका पोलीस अंमलदाराला बनावट ग्राहक म्हणून त्या ठिकाणी पाठवले. वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पथकाने घटनास्थळी छापा टाकला. यावेळी रजनी प्रभाकर डहाळे (रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी) या महिलेला ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेल्या महिलेच्या घराची झडती घेतली असता त्या ठिकाणी तीन महिला मिळून आल्या. त्यांच्याकडे चौकशी केली असता आरोपी महिलेकडून त्यांना वेश्या व्यवसायासाठी आणल्याचे आणि ग्राहकांकडून स्वतः पैसे घेऊन त्यातील काही भाग त्यांना देऊन त्यांच्याकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत त्या तीन पीडित महिलांची सुटका केली.

आरोपी महिला रजनी डहाळे हिच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात महिला व मुली यांचे अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ च्या कलम ३,४,५,७ व ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक कल्पना पवार, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक संदीप दरवडे, पोलीस अंमलदार विकास साळवे, विष्णू भागवत, शाहिद शेख, बिराप्पा करमल, अशोक लिपने ,विजय ठोंबरे व महिला पोलीस अंमलदार चिमा काळे यांच्या पथकाने केली.

# 'रेल्वे' प्रकल्पग्रस्तांना 'समृद्धी'प्रमाणे मोबदला मिळवून देऊ : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : नियोजित नाशिक शिर्डी रेल्वेमार्गातील बाधित शेतक-यांना समृध्दी महामार्ग प्रकल्पग्रस्तांप्रमाणे चांगला मोबदला मिळवून देऊ. झगडे फाटा ते वडगावपान रस्ता तिन वेळा दुरूस्त केला. मात्र ठरावीक ठिकाणी तो खराब होत असल्याने आता त्या भागाच्या कॉंक्रीटीकरणासाठी तब्बल सतरा कोटी रूपयांचा निधी मंजूर करून घेतला.



त्यामुळे या भागातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळेल. या संपूर्ण रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी १६५ कोटी रूपयांचा निधी मिळेल. त्यासाठी आपला सातत्याने पाठपूरावा सुरू आहे.असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले. कोपरगाव विधानसभा मतदार संघातील पोहेगाव येथे १७ कोटी रुपये निधीतून करण्यात येणाऱ्या झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख या तालुका हद्दीतील रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते.

> झगडे फाटा ते वडगाव पान हा रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणासाठी १६५ कोटींचा निधी आवश्यक आहे. त्यासाठी एडीबी, एनडीबी बँक, एआयडी बँक,आणि कुंभमेळ्यासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या निधीतून निधीची मागणी आपण लावून धरली आहे. ही तो मरेगा मागणी लवकरच मान्य होईल.
>
> **आ. आशुतोष काळे**

ते म्हणाले, समृद्धी महामार्गाप्रमाणे नियोजित नाशिक शिर्डी रेल्वेमार्गातील चांदेकसारे, पोहेगाव, सोनेवाडी, जवळके, शहापूर, बहादाराबाद, बहादरपूर, धोंडेवाडी आदी गावातील प्रकल्पबाधितांना मोबदला मिळवून देण्यासाठी आपण पुढाकार घेऊ. जोपर्यंत जमिनींचे अधिग्रहण होत नाही तोपर्यंत हरकती नोंदविता येतील. त्यासाठी ठराविक मुदत नाही. जोपर्यंत तुमचे समाधान होणार नाही तोपर्यंत आपण संघटीतपणे त्याचा पूर्ण पाठपुरावा करू त्यामुळे शेतक-यांनी काळजी करू नये.

आपण शेतक-यां सोबत आहोत. जिरायती ओळख असलेल्या तालुक्यातील तेरा गावात निळवंडेच्या पाण्याने समृध्दी आली. सोनेवाडी परीसरात एमआयडीसी आल्यामुळे जमिनीचे भाव वाढले. नाशिक-शिर्डी रेल्वेलाईनसाठी अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या जमिनीचा तसेच विहिरी, पाण्याच्या पाईपलाईन आदींचा योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी ज्याप्रमाणे समृद्धी महामार्गाच्या वेळी संघटीत राहून आंदोलन करून चांगला मोबदला मिळवून दिला. याहीवेळी तसेच संघटीत राहून मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना साकडे घालू व शेतक-यांना न्याय मिळवून देऊ.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.